'' मुले महत्वपूर्ण आहेत कडून'' सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळा

शिक्षक पुस्तीका

घटक 2



# काळ यंत्र

## शिक्षक पुस्तीका

सर्व वयांसाठी

# काळ यंत्र




‘‘ मुले महत्वपूर्ण आहेत कडून’’ सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळा

शिक्षक पुस्तीका

सर्व वयांसाठी

घटक 2: धडा 1-13

संकेत स्थळ

[www.ChildrenAreImportant.com/machine/](http://www.ChildrenAreImportant.com/machine/)

“मुले महत्वपूर्ण आहेत” च्या संपूर्ण चमूचे आभार!"

Editor and Creative Team Leader: Flor Boldo
Founders: Dwight y Kristina Krauss
Writer: Suzanna Kangas (Suki)
Creative Team: Jennifer Sánchez, Areli Salinas, Ramón Martínez, Marlon Hernández.
Designer: Julio Sánchez
Design Supervisor: Suzanna Kangas (Suki)
Consultants: Mike y Vickie Kangas
Ilustrations: Lindy & Friends in collaboration with NosrettepArt
**www.lindyandfriends.com**
Linda P. Romero
Fan page Administrator: Verónica Toj

# प्रस्तावना

‘‘काळ यंत्र’’ घटक 2 पवित्र शास्त्र शाळेमध्ये स्वागत आहे!

न्याय समूह भूतकाळात प्रवास करण्यासाठी काळ यंत्राचा उपयोग करतात ह्यासाठी कि येशूच्या जीवनाबद्दल शिकावे, आणि येशूचे जीवन ह्या समूहाच्या जीवनावर आणि आधुनिक समाजावर कसा परिणाम करतात ते सांगतात. ह्या हस्तपुस्किमध्ये आपले मुलं शिकतील आणि ‘‘न्याय’’ भागमध्ये जे ते शिकतील त्याचे लागूकरण करतील, जे मुख्य धड्यावर आधारित आधुनिक लागूकरण आहे. उदाः सर्व लोक देवाची निर्मीती आहे असे पाहणे. ‘‘गृहपाठ’’ विभाग जे ते शिकले त्याचे लागूकरण त्यांच्या दररोजच्या जीवनात करण्याची परवांगी देतो. उदाः जर कोणी तुम्हाला दुखाविले किंवा तुम्हाला फसविले तर भांडण करू नका. तर, शांत रहा आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करा, कि देवाने तुम्हाला शांती द्यावी. तुम्हाला कसे वाटले ह्या बद्दल तुमच्या संडेस्कूल शिक्षकाशी बोला. ‘‘जीवनचिरत्र’’ विभाग मुलांना विविध व्यवसाय आणि ते समाजाला कसा लाभ करतात हे शिकवितो, जसे न्याधिश, मिशनरी, व्यापारी, इतरांसारखे. ह्या भागातील काही व्यवसायाकडे वेगवेगळया देशांमध्ये नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते कारण व्यक्ति त्यांच्या हुद्याचा गैर वापर करतात. योग्य रित्या वागणे किंवा ह्या परिस्थितीत येशू काय करेल हे शिकविण्याची ही तुमची संधी आहे. कोणास ठाऊक? कदाचित प्रौढ झाल्यावर एखादा विद्यार्थी त्या व्यवसायात जाईल आणि योग्य ती गोष्ट करेल आणि त्याच्या सत्तेचा गैरवापर न करता इतरांच्या भल्यासाठी काम करेल. त्यांच्या सामाजात किंवा त्यांच्या राष्ट्रात ते येशूसाठी चमकतील. आणखी मुलं मजेशीर नाटक, खेळ आणि त्यांच्या विद्यार्थी पुस्तकातील कोडे सोडविणे ह्याचा आनंद घेतील. मोठे मुलं प्रश्न विभागामध्ये विचार करू शकतील, जिथे उद्दिष्ट हे बरोबर उत्तर देणे नाही, तर येशूच्या जीवनाचे त्यांच्या स्वतःच्या जीवनात लागूकरण करणे आहे. दर आठवडी नविन कार्ड गोळा करून हजेरी साठी प्रोत्साहन दिले जाईल.

शिक्षकांनो, आम्हाला खात्री आहे कि प्रत्येक धड्याद्वारे देव तुमच्या व तुमच्या विद्यार्थ्यांच्या जीवनाशी बोलेल, त्याची इच्छा आहे कि जग बदलावे, आणि नविन पिढीला प्रशिक्षित करण्यापेक्षा दुसरा उत्तम मार्ग नाही! कल्पना करा कि तुमच्या मुलांच्या मनामध्ये देव कार्य करत असतांना आणि कुठलाही भेदभाव न करता इतरांशी जवळ जाण्यासाठी त्यांची मदत करेल तेव्हा काय होईल. आम्ही प्रार्थना करतो कि मुलांना शिकविण्याच्या ह्या महत्वाच्या कार्यात सेवा करण्यासाठी देव तुम्हाला भरपूर आर्शिवाद देईल.

ख्रिस्तात प्रेमाने,

मुले महत्वपूर्ण आहे चा सर्जनशील संघ.


**Flor Boldo**


**Dwight y Kristina Krauss**


**Julio Sánchez**


**Marlon Hernández**


**Miguel y Vickie Kangas**


**Jennifer Sánchez**


**Areli Salinas**


**Ramón Martínez**


**Suzanna Kangas (Suki)**


**Verónica Toj**

# दृष्टीक्षेप

## 1 येशू सारखी काळजी घेणे

**4000 रांना जेवण देणे: मत्तय 15:29-38**

याकोब 2:15-16 " भाऊ किंवा बहीण ही उघडी आहेत, त्यांना रोजच्या अन्नाची वाण आहे, आणि तुमच्यामधील कोणी त्यांना म्हणतो, "सुखाने जा, ऊब घ्या व तृप्त व्हा;" पण त्यांच्या शरीराला पाहिजे ते त्यांना तुम्ही देत नाही तर त्यापासून काय लाभ?"

## 2 सर्वांसाठी मोफत

**विहिरीजवळील स्त्री: योहान 4:4-15**

रोमकरांस पत्र 12:16 " परस्पर एकचित्त असा. मोठमोठ्या गोष्टींवर चित्त ठेवू नका, तर लीन वृत्तीच्या लोकांचा सहवास ठेवा. स्वत:ला शहाणे समजू नका."

## 3 सर्व गोष्टीसाठी योग्य

**श्रीमंत तरूण शासक: मार्क 10:17-27**

मार्क 8:35 " कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो त्याला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरता व सुवार्तेकरता आपल्या जिवाला मुकेल तो त्याला वाचवील. कारण मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपल्या जिवाचा नाश करून घेतला तर त्याला काय लाभ?."

## 4 येशूची शिकवण पाळा

**येशूने 10 कुष्ठ रोग्यांना बरे केले: लूक 17:11-19**

फिलिप्पैकरांस पत्र 4:6 " कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा."

## 5 येशू सारखे नम्र असा

**येशूने त्याच्या शिष्यांचे पाय धुतले: योहान 13:3-17**

फिलिप्पैकरांस पत्र 2:3-4 " तट पाडण्याच्या अथवा पोकळ डौल मिरवण्याच्या बुद्धीने काहीही करू नका, तर लीनतेने एकमेकांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ माना. तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका, तर दुसऱ्यांचेही पाहा."

## 6 येशूसारखी कळकळ असलेले

**येशूने मेज पलटविले: मार्क 11:15-17 (योहान 2:13-17)**

मत्तय 23:13 "अहो शास्त्र्यांनो, अहो परूश्यांनो, ढोंग्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही लोकांना स्वर्गाचे राज्य बंद करता; तुम्ही स्वतःही आत जात नाही व आत जाणाऱ्यांनाही आत जाऊ देत नाही."

## 7 येशूचे ह्रदय उघडे झाले

**गेथसेमनी बागेत येशू: मत्तय 26:36-39,47-54**

लूक 6:27 " "परंतु तुम्हा ऐकणाऱ्यांस मी सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा; जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा;"

## 8 अन्याय!

**येशूवर खटला: मार्क 14:57-65, 15:1-15**

यशया 53:9 " त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते."

## 9 मृत्यूमध्ये जीवन

**येशू खिळला गेला: मत्तय 27:27-31, 45-54**

यशया 53:5 " खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले."

## 10 लज्जा तारली गेली

**वधस्तंभावरील चोर: लूक 23:32-33, 39-43**

रोमकरांस पत्र 10:11 "कारण शास्त्र म्हणते, 'त्याच्यावर विश्वास ठेवणारा कोणीही फजीत होणार नाही."

## 11 सर्वात वाईट दिवस सर्वात चांगला होतो

**येशूचे पुनरूत्थान: मत्तय 27:57-61, 28:1-10, लूक 24:36-48**

इब्री 11:1 " विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे."

## 12 असंभव विश्वासणारा

**शौल विश्वास ठेवतो: प्रेषित 9:1-20**

प्रेषितांची कृत्ये1:8 "परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."

## 13 मी सुध्दा येऊ शकतो काय?

**पेत्र तारणाचा संदेश देतो: प्रेषित 2:14, 36-40**

योहान 3:16 "देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे."

# ह्या साहित्याचा उपयोग कसा करावा

नाटक (भाग 1)

प्रत्येक नाटकामध्ये ‘न्याय समूह’ येशूच्या जीवनाचा काही भाग पाहण्यासाठी काळामध्ये मागे जातो जिथे समूहातील सदस्य समांतर धडा शिकतात आणि त्यांच्या आधुनिक जीवनात त्याचे लागूकरण करतात. प्रत्येक नाटकाचा काही भाग मुख्य धड्याच्या आधी लिहिलेला आहे, जिथे ते काळात मागे जातात आणि नाटकाचा दुसरा भाग मुख्य धड्याच्या नंतर येतो, जेव्हा पात्र परत येतात आणि जे काही ते शिकले त्याचे लागूकरण करतात. नाटकं 3 पात्रांसाठी रचलेले आहेत, पुढारी, तपासक, आणि प्रतिनिधी. इतर दोन पात्र कामगार आणि तंत्रज्ञ हे ऐच्छिक आहेत जर तुमच्याकडे अधिक स्वयंसेवक असतील तर.




**मुख्य धडा**

सुरवातीच्या नाटकानंतर मुख्य धडा येतो. पवित्र शास्त्रातील गोष्टी धड्यामध्ये पूर्ण लिहिलेल्या नाहीत, म्हणून पवित्र शास्त्रातून गोष्ट वाचण्यास विसरू नका.

**नाटक (भाग 2)**

मुख्य धड्या नंतर नाटकाचा दुसरा भाग पूर्ण करा, जिथं समूह जे ते शिकले त्याचा संभ्रम सोडवितात. (आमच्या यू ट्यूब चानल ला भेट द्या आणि उदाहरण पहा)

Link: https://www.youtube.com/watch?v=29oPA594_1s

**न्याय**

ह्या लहान विभागाची उजळणी करा, विद्यार्थी पुस्तकातील कोडे सोडवितांना किंवा फराळ खातांना.

**जीवन चरित्र**

जीवन चरित्र विभाग मुलांना विविध व्यवसायांबद्दल आणि ते सामाजाचा कसा फायदा करतात ह्या बद्दल शिकविते, आत्मचरित्र विभाग मुलांना विविध व्यवसायांबद्दल व ते सामाजाला कशी मदत करतात हे शिकवितात, जसे पाळक, वकिल, वैज्ञानिक, आणि पोलीस. ह्या विभागातील काही व्यवसायांकडे काही देशांमध्ये नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते कारण काही व्यक्ति त्यांच्या अधिकाराच्या जागेचा दूरउपयोग करतात. एखाद्या व्यक्तिने काय करावे किंवा येशूने त्या जागी काय केले असते हे मुलांना शिकविण्याची ही तुमची संधी आहे. कोणास ठाऊक? कदाचित तुमच्या वर्गातील एक विद्यार्थी मोठा झाल्यावर त्या व्यवसायात

जाईल आणि तो योग्य ते करेल आणि स्वतःच्या अधिकाराचा गैरफायदा घेण्या ऐवजी इतरांच्या भल्यासाठी कार्य करेल. ते त्यांच्या सामाजात किंवा त्यांच्या देशात येशूसाठी प्रकाश म्हणून चमकतील.

सुरवातीला लहानसा खेळ खेळून ते अधिक मजेशीर बनवा. कोणालातरी त्या व्यवसायाचा अभिनय करू द्या आणि तुम्ही सांगण्याआधी मुलांना ते ओळखू द्या.

**पाठांतर वचन**

प्रत्येक पाठांतर वचन धड्याला लागू होतं. पाठांतर मजेशीर करण्यासाठी एखादा खेळ किंवा कृती करण्याचा विचार करा.

आम्ही "पाठांतर वचन खेळ" मोफत डाऊन लोड चा पुरस्कार करतो

Link: http://www.childrenareimportant.com/myCMU/series/series-memory-verse-खेळs.php

**विद्यार्थी पुस्तकं**

विद्यार्थी पुस्तकातील कोडे सोडविणे मुलांना आवडेल. शब्द शोधा आणि चित्र रंगविणे हे प्रत्येक धड्यावर अधिक भर देण्यासाठी मदत करतील. शब्द शोधातील शब्दाची चर्चा करा, जसे मोल, नम्रता आणि न्याय आणि मुलांना विचारा कि त्या शब्दांचा त्यांच्यासाठी काय अर्थ आहे.

**प्रश्न आणि उत्तरं (मोठया विद्यार्थ्यांसाठी )**

प्रौढांच्या जगामध्ये जीवन गुंतागुंतीचे आहे. जर कठिण समस्यांचे उत्तरं देण्यासाठी कोणीतरी नेहमी आपल्या जवळ असले तर आपल्याला आवडेल नाही का? परंतू सहसा ते नसतात आणि आपण जितकं शक्य होईल तितकं आपल्या स्वतःच्या निष्कर्षा पर्यंत पोहचलो पाहिजे. मोठे विद्यार्थी सुध्दा प्रौढ होत आहेत. आणि आपण रविवार शाळेमध्ये एवढच करतो कि त्यांना सर्व गोष्टींसाठी 'बरोबर उत्तरं' सांगितले आणि कठिण प्रश्न टाळले, तर ही गोष्ट त्यांना अप्रशिक्षित ठेवते आणि त्यांना गोष्टींचा पूर्ण विचार करता येत नाही आणि पवित्र शास्त्रामधून स्वतः उत्तरं शोधता येत नाहीत. ह्या मुळे जेव्हा त्यांचा सामना ह्या कठिण प्रश्नांशी होते ते भ्रमित आणि हरवलेले असतात आणि केवळ कॉलेज मधील प्राध्यापक आणि बॉस ह्यांचे ऐहिक उत्तरं ऐकतात. त्या ऐवजी ह्या भागाचा उपयोग मोठया मुलांना गंभीर विचार करण्याचा सराव करण्यासाठी करा. मोठया मुलांमध्ये चर्चा सुरू करा. त्यांना 'बरोबर उत्तर' देऊ नका, परंतू त्यांना स्वतः चांगल्या निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी सौम्य पणे मदत करा.

शिक्षकांसाठी मार्गदर्शन म्हणून आम्ही ह्या कठिण प्रश्नांचे काही उत्तरं पूरविली आहेत.

## वेळापत्रक

सुरवात
- स्वागत
- गीत

नाटक आणि धडा
- नाटक भाग 1
- धडा
- नाटक भाग 2

कृती

विद्यार्थी पुस्तक किंवा फराळ अशा इतर कृती करतांना जीवनचरित्र व न्याय विभाग करा .
- पाठांतर वचन
- विद्यार्थी पुस्तक
- प्रश्न व उत्तरे (मोठ्या विद्यार्थ्यांसाठी)
- खेळ (ऐछिक)

समाप्ती
- गृहपाठ
- हजेरी कार्ड

खेळ

मुलांबरोबर खेळ खेळा! मुलांसाठी खेळ खूप महत्वाचे आहेत, ते त्यांना सामाजिक कौशल्य विकसित करण्यासाठी मदत करतात. शिवाय, ते मजेशिर असतात! जेव्हा मुलं त्यांच्या मित्रांना तुमच्या वर्गात आमंत्रित करतात तेव्हा मुलांना येऊन येशू बद्दल एकण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी हे चांगले साधन आहे.

गृहपाठ कार्य

पवित्र शास्त्र सांगते कि जर आपण वचन ऐकतो परंतू त्याचे लागूकरण करत नाही तर त्याचा काही उपयोग नाही. (याकोब 1:22-25.) जे काही ते शिकले त्याद्वारे काही तरी करून देवाच्या वचनाचे लागूकरण त्यांच्या दैनंदिन जीवनात करण्यासाठी मुलांना प्रशिक्षित करा. ज्या मुलांनी मागील आठवडयाचा गृहपाठ पूर्ण केला त्यांना एखादे चॉकलेट किंवा लहान बक्षीस देऊन प्रतिफळ देण्यासाठी काही मिनिट घ्या.

## कार्ड

ह्या कार्डांचा उपयोग उपस्थितीसाठी मोबदला देण्यासाठी करा. प्रत्येकावर समोर गंमतीशीर डिझाइन आहे आणि मागील बाजूस पाठांतर वचन आहे.



**4000 रांना जेवण देणे: मत्तय 15:29-38**

नाटक( भाग 1)

तपासकाने ह्या आठवडयात दररोज कोणालातरी गरजू असे पाहिले, जो अशक्त, भुकेला आणि घाणेरडा दिसत होता. तीने तिच्या संघातील इतर सदस्यांना, पुढाऱ्याला आणि प्रतिनिधीला त्या व्यक्तिबद्दल सांगितले आणि हे कि ती त्या व्यक्तिसाठी संपूर्ण आठवडाभर प्रार्थना करत होती. त्यांना वाटले कि ती चांगली कल्पना आहे. ते काळ यंत्रात चढतात आणि जर शक्य असेल तर, ते काळ यंत्र हालवितात आणि यांत्रिक आवाज करता जेव्हा ही यंत्र त्यांना धड्याच्या वेळेसाठी काळात मागे नेते.

धडा

मोठा लोक समूदाय येशूचे शिक्षण एकत त्याच्या मागे जात होता. येशूचे ऐकणे आणि तो करत असलेले चमत्कार पाहण्यात ते इतके संतुष्ट होते कि त्यांनी काहीच खाल्ले नाही आणि ते भूकेले होते. येशूला त्यांचा कळवळ आला.
मत्तय 15:29-38 वाचा
त्याच्या मनात कळवळा असणे ह्याने समूदायाची भूके संबंधी मदत केली नाही. येशूने त्याच्या भावना कृतीत आणल्या, त्याने चमत्कार केला आणि 4000 लोकांना सात भाकरी आणि काही मासे वापरून तृप्त केले. सर्वजण तृप्त झाले! येशूने कमीत कमी पेक्षा अधिक पूरविले, त्याने पूरेसे पेक्षा अधिक केले. तुमच्या हदयामध्ये कळवळा निर्माण करणारे लोक तुम्हाला माहित आहेत काय? ज्यांच्याकडे तुमच्यापेक्षा कमी आहे किंवा जे कोणत्यातरी रित्या छळलेले आहेत? येशूसारखे कोणातरी साठी खरा कळवळा असणे हे नेहमीच कृतीत परावर्तीत होते. जा त्या संबंधी काही तरी करा!
जगातील कितीतरी समस्या मोठया आहेत आणि आपल्याला वाटते कि ‘‘मी त्याच्यासाठी काहीच करू शकत नाही.’’ परंतू आपण मदत करण्यासाठी नेहमीच एक व्यक्ति शोधू शकतो. आणि त्यांची मदत करून येशू आपल्याला जे प्रेम देतो त्यातील काही त्यांना देणे हे समाधानकारक आहे.

पाठांतर वचन

याकोब 2:15-16 " भाऊ किंवा बहीण ही उघडी आहेत, त्यांना रोजच्या अन्नाची वाण आहे, आणि तुमच्यामधील कोणी त्यांना म्हणतो, “सुखाने जा, ऊब घ्या व तृप्त व्हा;” पण त्यांच्या शरीराला पाहिजे ते त्यांना तुम्ही देत नाही तर त्यापासून काय लाभ?


नाटक (भाग 2)

मुख्य धडा संपल्यानंतर संघ वर्तमानकाळात परत येतो आणि काळ यंत्रातून बाहेर येतो. जे काही त्यांनी पाहिले ते पाहून ते आश्चर्यचकित आहेत, कि कसे येशूने भाकर व मासे इतक्या लोकांसाठी पूरेशी केली. त्यांनासुध्दा झुडुपांमागे पडलेले भाकरीचे काही तुकडे खायला मिळाले ( कारण ते काळाचा अवधी तोडणार नाहीत ह्यासाठी न दिसण्याचा पूरेपूर प्रयत्न करतात). तपासक संघाला सांगतो कि कसे येशूने केवळ कळवळा अनुभवला आणि भूकेल्या लोकांसाठी प्रार्थना केली नाही तर त्याने त्यांना जेवू घातले. तिच्या लक्षात येते कि दररोज रस्त्यावर दिसणाऱ्या गरजू व्यक्तिसाठी तिने काही तरी केले पाहिजे. कशी मदत करायची ह्याचा ते विचार

करतात, जसे घरून सॅन्डविच आणणे किंवा जवळ एखादी सेवा शोधणे जीची ओळख ती त्या व्यक्तिशी करून देईल, तसेच त्या व्यक्तिसाठी प्रार्थना करणे.

### न्याय

येशूने लोकांची खरंच काळजी घेतली. त्याला भूकेल्या लोकसमूदायाचा कळवळा आला आणि त्याने त्यांना जेवू घातले. आपण नेहमीच औदार्यपूर्ण राहूण इतरांच्या गरजा पूरविण्यासाठी तयार असले पाहिजे.



### जीवनचरित्र  मालक किंवा अधिकारी

अधिकारी जे संस्थेच्या सर्व किंवा काही भागावर दंखरेख करण्यासाठी किंवा कामगिरी पूर्ण करण्यासाठी एकत्र काम करणाऱ्या संघावर लक्ष ठेवण्यासाठी जवाबदार असतात. पवित्र शास्त्रामध्ये ह्याचे अनेक उदाहरणं आहेत, राजे, संगीत निर्देशक, शासक, प्रकल्प व्यवस्थापक.

जवाबदा-याः अधिकाऱ्या ला संस्थेचे उद्दिष्ट समजलेच पाहिजे आणि तिने हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तिच्या संघाचे नेतृत्व केले पाहिजे. अधिकाऱ्याचे काम हे असते कि सर्वजण योग्य कार्य करणाऱ्या प्रणालीत सुसंग काम करतील ह्याची खात्री करावी, आणि तुमचे नियोजीत परिणाम प्राप्त करण्यापासून काहीही तुम्हाला वंचीत ठेवणार नाही. कंपनीचे नाव व ख्याती ह्याचे संरक्षण करणे हे अधिकाऱ्याचे काम आहे; आणि व्यवसायाला विविध दिशेत भटकण्यापासून वाचविणे.

संधीः आपला महान राजा येशू ह्याच्याकडून अधिकारी शिकू शकतो कि सेवक पुढारी कसे व्हावे. एक महान सेवक त्याच्या कामक-यांवर वर्चस्व दाखविणार नाही तर त्यांची सेवा करेल. त्याच्या कामक-यांना प्रोत्साहन देउन, इतरांपुढे त्यांना श्रेय देउन, त्यांचे चांगले काम व सेवा हयांची दखल घेउन आण् त्याच्या कामक-यांच्या चांगल्या कल्पना साकार होण्यासाठी मदत करण्यासाठी अधिकाऱ्याकडे चांगली संधी असते. सेवक संयोजक हा त्याच्या संघाचे अपयशाच्या मार्गावर जाण्यापासून संरक्षण करेल आणि परस्पर वैयक्तिक नाटय, आणि कधी कधी इतरांच्या भल्यासाठी कठिण निर्णय घेउन त्यांचे मार्गदर्शन करेल. एक अधिकारी त्याच्या कामक-यांना त्यांचे काम उत्तम रित्या करण्यासाठी साहित्य, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देवून तसेच वाढण्यासाठी आणि नविन कौशल्य विकसित करण्यासाठी संधी देतो, तसेच त्यांच्या कामक-यांची नैसर्गिक क्षमता शोधतो आणि त्यांना त्यांच्या स्वतःच्या क्षमता विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देतो.

### प्रश्न उत्तरं

1. मी कधी कधी देवाच्या गोष्टीसंबंधी सहज का नसतो?

बऱ्याच वेळेस, आपले मित्र आपल्याला चांगले वाटवतील ह्याची आपल्याला सवय असते, त्यांच्या आधाराशिवाय किंवा त्यांच्या संमतीशिवाय आपण कुठेही अस्वस्थ होवू. लक्षात ठेवा देवाचे वचन आपल्याला 2 तिमथी 2:15 मध्ये शिविते (मोठयाने ते वाचा  कि तुमच्या मित्रांची स्वीकृती ह्या पेक्षा तुम्ही देवाच्या स्वीकृतीचा अनुभव घेतला तर अधिक बरे होईल, आणि जितकं ज्यास्त तुम्ही वचन वाचाल आणि ते आचारणात आणाल, तितकं ज्यास्त ते भविष्यात तुमची मदत करेल, ते वृत्ती सुध्दा बदलते.


2. तुमचे आईवडील आणि अधिकारी हयांना तुम्ही कळवळा कसा दाखवू शकता?


देव ह्यागोष्टीचे कौतुक करतो कि आपण आपल्या आईवडीलांच्या अधिन असावे, अभिवचन असलेली ही पहिली आज्ञा आहे. जर तुमच्या आईवडीलांवर नकारात्मक रित्या परिणाम करणारी वृत्ती तुम्ही खरंच बदलू इच्छिता तर एका क्षणासाठी विचार करा कि आपण असे का वागलो, मी इतरांना कळवळा दाखवू शकतो आणि आईवडीलांना नाही? बदलणे हा वयैक्तिक निर्णय आहे आणि नम्रतेच्या वृत्तीने जर आपण ते क्षेत्र देवाला देतो तर आपण बदलू शकू आणि आपण आपल्या एकत्र वेळेचा अधिक आनंद घेवू शकू.

## कोड्यांची उत्तरे



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लो | जे | ळ | व | मा | उ | स्या | प्री | र | शू |
| भा | क | वू | ळा | से | य | त | घा | ती | उ |
| क | व | ये | घा | दा | ळ | भा | स | ळा | दा |
| री | उ | ना | मु | त | क | च | म | त्का | र |
| ये | र | स | डी | म | ले | ये | स्या | द | शू |
| स्या | क | पि | भू | उ | म | शू | त | घा | त |
| लो | व | ळा | क | ळ | व | ळा | लो | क | र |





दिलेल्या सूचीतील एक शब्द वाक्य पूर्ण करण्यासाठी वापरा. न वापरलेल्या शब्दापुढे X चिन्ह करा

4000 भाकर धोंडे जेवू घातले दया

राग मासे वेळ लोकसमुदाय 100

मला माहित नव्हते....

एक मोठा ___लोकसमुदाय___ येशूच्या मागे गेला.

येशूने ___4000___ लोकांना जेवू घातले,


येशूला लोकसमुदायाचा ___भाकर___ आला व त्याने त्यांना ___वेळ___.

सात ___दया___ व काही ______ ह्यांनी

## खेळ

***तुमच्या शरीराने अभिवाद करणे.***

शिक्षक मुलांना दोन गोल तयार करण्यासाठी आमंत्रित करतात, एकसारखे लोकांचे, आणि गोलांना एकमेकांकडे तोंडकरायला सांगतात. त्यांना एकमेकांना हात दाखवून त्यांचे नाव सांगू दया, त्यांना काय आवडते आणि काय आवडत नाही ते सांगू दया. शिक्षक इशारा करून गोलांना विरूध्द दिशेत पलटायला सांगतात, असे कि जेव्हा निर्देश थांबतो तेव्हा प्रत्येक मुल हे दुसऱ्या व्यक्तिच्या समोर राहिल. शिक्षक त्यांना एकमेकांना टाळी दयायला सांगतात, आणि त्यांचे नाव सांगून व इतर प्रश्न विचारून ओळख करायला सांगतात. उदा. तू ह्या आठवडयाच्या शेवटी काय केले? सभेबद्दल तुला काय आवडते? मग ते पुन्हा पलटतात आणि ह्या वेळेस ते त्यांचे पाय हालवतात, मग त्यांच्या हाताचे ढोपर, खांदे इ.






## गृहपाठ

तुमच्या शाळेतील किंवा तुमच्या शेजारील सहकारी निवडा. जर योग्य असेल तर, तुमच्या आईवडीलांना मदत मागा कि त्याच्यासाठी फळं, नाश्ता किंवा खाण्यासाठी काही आणावे- त्याला व त्याच्या कुटुंबाला पूरेल एवढे. तुमच्या दप्तरात वाटण्यासाठी ज्यास्त जेवण न्या. लक्षात ठेवा कि जी व्यक्ति तुमची शाळा स्वच्छ करते तिच्या बरोबर सुध्दा तुम्ही असे करू शकता.

# सर्वांसाठी मोफत

02

**विहिरीजवळील स्त्रीः योहान 4:4-15**



नाटक(भाग 1)

तपासक हल्ली शहराच्या दुसऱ्या बाजूच्या कोणाला तरी भेटली. ती तिच्या संघाला सांगते कि कसे ह्या नवीन मित्राच्या कल्पना तिच्या पेक्षा वेगळया आहेत. ज्या गोष्टीचे तिला महत्व वाटते त्याचा तिच्या मित्रावर काहीच परिणाम होत नाही. आणि वयैक्तिक स्वच्छता कशी असावी ह्यासंबंधी तिच्या मित्राच्या कल्पना खूपच वेगळया आहेत. ती तिच्या नविन मित्र बरोबर येशू बद्दल बोलू इच्छिते परंतू कसे ते तिला माहित नाही. ते काळ मागे जातात हे पाहिण्यासाठी कि येशू त्याच्या पेक्षा वेगळया अशा व्यक्तिला कसे हाताळतो.

धडा

यहूदी व शमरोनी हे शत्रू होते ज्याच्यात ते मान्य करत होते त्यापेक्षा बरेच काही समान होते. ते एकाच पूर्वजाचे नातेवाईक होते, आणि ते सर्वच कमीत कमी पवित्र शास्त्रातील पहिल्या 5 पुस्तकावर विश्वास ठेवत होते! आणि शिवाय ते सर्व देवाने निर्माण केलेले लोक होते! परंतू त्यांचे पटत नव्हते, विशेषतः कारण लोक त्यांना तसे सांगत होते. आपल्याला खरंच माहित नाही का. पूर्वग्रह असाच काम करतो. परंतू येशू सर्वांवर प्रिती करतो आणि शमरोनी स्त्री बरोबर बोलण्यासाठी घाबरला नाही. इतर लोक त्यासंबंधी काय विचार करतील ह्या बद्दल सुध्दा तो घाबरला नाही.

योहान 4:4-15 वाचा

गोष्ट भौतिक पाण्याबद्दल नाही. ह्या गोष्टीत येशूने जे पाणी मागितले ते त्याला कधीच मिळाले नाही. त्याला मिळाले असेल, परंतू ते गोष्टीत महत्वाचे नव्हते. जे महत्वाचे होते ते हे कि येशू ह्या स्त्रीला ‘‘जीवनी पाणी’’ देवू इच्छित होता. येशू, तारण आणि समाधानी जीवन जे आपण येशू बरोबर प्राप्त करू शकतो आणि जे तो सर्वांना देवू इच्छितो त्याबद्दल बोलत होता.

तुम्हाला त्या प्रकारचे जीवन पाहिजे काय? कधीही तान्हेले नाही, अधिक प्राप्त करण्यासाठी सतत झुरत नसलेले? तुम्ही कोणीही असले तरी येशू तुम्हाला ते देवू करत आहे!!!

पाठांतर वचन

रोमकरांस पत्र 12:16 परस्पर एकचित्त असा. मोठमोठ्या गोष्टींवर चित्त ठेवू नका, तर लीन वृत्तीच्या लोकांचा सहवास ठेवा. स्वत:ला शहाणे समजू नका.

नाटक (भाग 2)

जेव्हा ते परत येतात तेव्हा त्यांनी जे पाहीले त्याच्या विषयी उत्सुकतेने बोलतात, कि कसे येशू त्या स्त्री बरोबर बोलला, जीने पूर्ण गावाला येशूला भेटण्यासाठी आणले. मग त्यांच्या लक्षात येते कि येशूची जीवनी पाण्याची भेट ही सर्वांसाठी मोफत आहे, ते कोणीही असले किंवा कुठलेही असले तरी. तपासक प्रोत्साहित होते कि ती तिच्या नवीन मित्राबरोबर येशू बद्दल बोलू शकते आणि पुढील वेळेस तसे करण्याचे ठरविते.


## न्याय

ज्या लोकांना जगाने नाकारले आहे त्यांच्याबरोबर संवाद साधण्यास येशू घाबरला नाही. येशू सारखे व्हा आणि सामाजीक स्थितीमूळे तुम्ही सहसा ज्या व्यक्ती बरोबर बोलू इच्छित नाही त्यांच्या बरोबर बोला.

## जीवनचरित्र (गृहिणी)

जी स्त्री घरकाम करते तिला गृहिणी म्हणतात. ते त्या व्यक्ति बद्दल आहे जी घराच्या दैनंदिन कामकाजासाठी जे आवश्यक आहे त्यावर देखरेख करते.

जवाबदारीः गृहिणी घर स्वच्छ ठेवण्यासाठी, कपडे धुण्यासाठी, स्वयंपाक, खरेदी करण्यासाठी जवाबदार असते आणि जर तिला मुलं आहेत तर ती त्यांची काळजी घेते, त्यांच्या अभ्यासात मदत करते, बाकि विविध कामां बरोबर. ह्या जवाबदाऱ्या असल्या तरी, इतर व्यक्ति प्रमाणे जीच्या कडे नोकरी आहे किंवा जी घराच्या बाहेर काम करते तिच्या सारखे तिला त्या बद्दल आर्थिक मोबदला मिळत नाही.



संधीः जी स्त्री मुलांबरोबर घरी राहते तिच्या लहान मुलांच्या क्षमतांचा फायदा घेवू शकते; त्यांना समाजावू शकते आणि त्यांना मूल्य व तत्व आणि देवाचे वचन शिकवू शकते. ज्या जीवनांची घडी उघडत आहे त्यांच्यावर परिणाम करण्याची ही महान संधी आहे.

सध्या आपण हे समजून घेतले पाहिजे कि पुरूष किंवा स्त्री असण्याच्या आधी आपण प्रथम असे लोक आहोत जे दोघेही देवाने आपल्याला ज्या क्षमता दिल्या आहेत त्याच्या अनुसार घरात वेगवेगळे कार्य करू शकतो. आपण केवळ स्वतःवर विश्वास ठेवला पाहिजे आणि आपल्या जीवनासाठी देवाचे जे उद्देश ते साध्य केले पाहिजेत.

## प्रश्न आणि उत्तरे

1. जे लोक मला आवडत नाहीत त्यांच्या बरोबर मी चांगले संबंध कसे ठेवू शकतो?

जरी आपल्याला वाटते कि ते कठिण आहे, तरी जे लोक आपल्याला आवडत नाहीत त्यांच्याशी जूळवून घेणे दिसते तितके कठिण नाही. बरेचदा, आपल्या मित्रांना एखादी व्यक्ति आवडत नाही म्हणून आपल्याला ती व्यक्ति आवडत नाही, परंतू आपण त्या व्यक्तिला जाणून घेण्याचा प्रयत्नच केला नाही. तुमच्यासाठी ही बदल घडवून आणण्याची संधी आहे.

2. जर एखाद्या व्यक्तिची चांगली ख्याती नाही अशा व्यक्तिबरोबर मी सहवास ठेवतो तर काय?

इतिहासात ते आपल्या शमरोनी स्त्री बद्दल सांगतात, जिचे नाव आपल्याला माहित नाही, परंतू तिची ख्याती माहित आहे. परंतू, येशूने तिच्या बरोबर तारणाची योजना सांगू नये ह्यासाठी ते कारण नव्हते. त्याच रितीने ते आपल्या बरोबर होवू शकते, एखाद्याकडे आपल्याला जावेसे वाटत नाही, ह्या भितीने कि इतर लोक काय म्हणतील, तरी ज्या लोकांपर्यंत इतर कोणी पोहचू शकत नाही त्यांच्या पर्यंत पोहचण्यासाठी आपण पहिले पाऊल उचलू शकतो; आपल्याला मोठे आश्चर्य मिळू शकते.


3. येशूने जे सर्व केले त्याचे मी अनुकरण करावे काय?

सहसा, ज्या कृती त्याने केल्या त्यांनी आपल्याला दिशा मिळाली पाहिजे, ह्याचा अर्थ हा नाही कि ज्या गोष्टी त्याने केल्या त्या हूबेहूब आपण केल्या पाहिजेत, परंतू आपल्या वागणूकिमध्ये निर्णय घेण्यासाठी ते आपला संदर्भ आहे. पौल आपल्याला त्याचे अनुकरण करण्याचे आव्हान करतो जसे तो ख्रिस्ताचे अनुकरण करतो. (1 करिंथ 11:1), त्याबद्दल जे उल्लेख आपण करू शकतो त्यासंबंधी एक उल्लेख, मला फिलिप्पै 2:3-8 आवडतं, आपण स्वतःचा फायदा नसतांनाही इतरांचे कल्याण करण्याची वृत्ती ठेवली पाहिजे.

## कोड्यांची उत्तरे







## खेळ

***हावभाव आणि अभिवादन***



संपूर्ण गटाला एक गोल तयार करायला सांगा. एक व्यक्ति हावभाव किंवा कृतीसह तिचे नाव सांगून सुरवात करतो जसे, उडी मारणे, अभिवादन करणे, नाचणे इ. आणि प्रत्येक जण त्याची पुनरावृत्ती करेल. प्रत्येकाने हावभाव, कृती सह त्याचे नाव सांगेपर्यंत आणि पूर्ण गटाने त्याची पुनरावृत्ती करे पर्यंत ते करत राहा.




## गृहपाठ

तुमच्या शाळेच्या खोलीत समस्या असलेल्या मुलाबरोबर किंवा मुलीबरोबर, किंवा बाहेरून आलेल्या मुलाबरोबर, किंवा दुसऱ्या धर्मीय मुलाबरोबर बोला. पूर्वग्रहाला तुम्हाला दूर ठेवू देवू नका. त्याला सकाळी अभिवादन करा किंवा त्याला विचारा कि त्याचा दिवस कसा गेला. जर हिम्मत असेल तर आपले जेवण वाटून दया आणि जर तुम्हाला नकारात्मक प्रतिक्रिया मिळाली तर आश्चर्य मानू नका. ह्या आठवडी प्रयत्न करा आणि तुमच्या संडेस्कूल शिक्षकाबरोबर बोला कि काय झाले.

# सर्व गोष्टीसाठी योग्य

03



**श्रीमंत तरूण शासकः मार्क 10:17-27**

नाटक (भाग 1)

प्रतिनिधी त्याला ह्या काळापासून त्रास देणारी गोष्ट सांगतो. त्याचा आवडता व्हीडिओ गेम आहे जो तो संधी मिळताच खेळतो. ते इतके मजेदार आहे कि तो तासन्तास तो खेळू शकतो, आणि तो त्यासंबंधी अधिकाधिक चांगला होत आहे, आणि मोठमोठया लढाया जिंकत आहे आणि त्याच्या कडे परितोषिकांचा व विशेष वस्तूचा संग्रह आहे ज्यातील काही फारच दुर्मिळ आहेत. परंतू हल्ली तो खेळ त्याला त्रास देत आहे काही त्या खेळामध्ये काही वृत्ती आहे आणि काही वाईट गोष्टी आहेत ज्या त्याला त्याच्या मनात माहित आहेत कि चूकिच्या आहेत. परंतू ते निरूपद्रवी मजा असल्यासारखे वाटते. तो तरीसुध्दा गृहपाठ आणि घरातील कामं पूर्ण करू शकतो. तो केवळ फावल्या वेळात खेळतो. संघ काय करावे ह्या संबंधी थोडा संभ्रमात आहे. ते निर्णय घेतात कि भूतकाळात त्यांना काही शिकायला मिळते काय ते पहावे.

धडा

देवाची इच्छा नाही कि त्याच्या आणि आपल्या मध्ये काही यावे. तो आपल्यावर इतकि प्रिती करतो कि तो आपल्याकडे बाळ म्हणून आला जेणे करूण तो आपल्या जगाचा अनुभव घेऊ शकेल आणि आपण जिथे राहतो तिथे आपल्याला भेटू शकेल! चला ह्या गोष्टी कडे पाहू.

मार्क 10:17-27 वाचा

जेव्हा श्रीमंत मनुष्याने येशूला विचारले कि तारण प्राप्त करण्यासाठी त्याने काय करण्याची आवश्यकता आहे, येशूला दिसून आले कि त्या मनुष्याने देवाबरोबरच्या संबंधांपेक्षा संपत्तीला अधिक महत्व दिले आणि येशूने ह्या एका गोष्टीवर लक्ष केंद्रित केले. येशूने त्याला सांगितले कि त्याने त्याची मालमत्ता विकावी आणि ते पैसे गरिबांना वाटावे. परंतू येशू बरोबर होता, तो मनुष्य ते करू शकला नाही. देवाबरोबर वयैक्तिक संबंधांपेक्षा त्याला त्याची संपत्ती अधिक महत्वाची होती.

तुमच्यासाठी काय महत्वाचे आहे? तुमच्यासाठी देवा शिवाय सर्वात महत्वाच्या गोष्टींबद्दल विचार करा. तुमची आवडती खेळाणी देण्यासाठी तुम्ही तयार राहाल काय? किंवा देवाचे अनुसरण करण्यासाठी तुमच्या कुटुंबाला सोडण्यास आणि तुमच्यासाठी त्याच्या जवळ जे आहे ते करण्यास तयार राहाल काय?

आपल्या प्रत्येकाबरोबर देवाला वयैक्तिक संबंध हवे आहेत, इतके कि देवाच्या आणि आपल्या मध्ये जे काही येते त्यासाठी तो ईर्षावाण आहे. पैसा, प्रसिध्दी, मित्र, आणि सामाजिक स्थान हे सर्व देव आणि आपल्या मध्ये अडखळण असे होवू शकतात. आपल्याला चांगल्या गोष्टींपासून वंचित ठेवणे हा देवाचा उद्देश नाही, तर त्याच्या बरोबर भरपूर जीवन देणे हा आहे. आणि ह्या गोष्टी त्याच्या मध्ये येवू शकतात.

पाठांतर वचन

मार्क 8:35 " कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो त्याला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरता व सुवार्तेकरता आपल्या जिवाला मुकेल तो त्याला वाचवील.कारण मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपल्या जिवाचा नाश करून घेतला तर त्याला काय लाभ?."

## नाटक (भाग 2)

जेव्हा ते परत आले, तेव्हा प्रतिनीधी संपूर्ण समूहाला सांगतो कि त्याने काय करावे ह्या बद्दल तो आता स्पष्ट आहे. जरी खेळ मजेशीर वाटत प्रतिफळ देणारा असला, त्याच्या कडे भरपूर वस्तू गोळा झाल्या असल्या तरी ह्यातील काहीच त्याला येशूच्या मागे जाण्यापेक्षा महत्वाच्या नाहीत. कदाचीत तो वेगळा व्हीडीओ गेम खेळू शकतो जो देवाला अधिक सन्मान देवू शकेल, परंतू त्याने त्याचा आवडता खेळ खेळणे थांबविले पाहिजे. पुढारी सल्ला देतो कि जर त्याला मोहीत करणाऱ्या खेळा पासून दूर राहायचे असेल तर त्याने त्याच्या यंत्रातून तो खेळ पूर्णपणे काढून टाकला पाहिजे कि मोह दूर करावा. प्रतिनिधीघरी गेल्या बरोबर तसे करण्यास सहमत होतो.

## न्याय

जेव्हा तुमच्या पेक्षा कमी वस्तू किंवा पैसे असलेला व्यक्ति तुम्ही पाहता तेव्हा, हे लक्षात ठेवा कि त्या व्यक्ति आणि देवाच्या मध्ये कमी वस्तू आहेत.

## जीवनचरित्र (व्यापारी)

व्यापारी अशी व्यक्ति आहे जी खरेदी, विक्री करण्यासाठी वाटाघाटी करण्यासंबंधी समर्पित असते. हा शब्द ज्यांचा स्वतःचा व्यवसाय आहे किंवा जो इतर व्यवसायात काम करतो त्याच्यासाठी वापरला जातो.

जवाबदा-याः ते इतर अधिक वस्तूंसह समाजाला आवश्यक मूलभूत वस्तू आणि आवश्यकतेनुसार लागणारी औषधं सुध्दा पुरविण्यावर लक्ष देतात. हे पाहणे मनोरंजक आहे कि व्यापारी जगातील सर्वात जुन्या क्रियांपैकि एक करत असतात.

संधीः व्यापारी ते लोक आहेत जे वस्तू विकत घेतात आणि विकतात. ह्या प्रकारे ते शहरातील अनेक लोकांच्या संपर्कात येतात. प्रामाणिक व्यक्ति असणे आणि ज्या व्यक्ति बरोबर तुम्ही बोलत आहात त्याच्यासाठी धडा सोडणे महत्वाचे आहे.

तुमच्या जीवनातील देवाच्या चांगूलपणाची साक्ष देण्याची ह्या पेक्षा चांगला मार्ग कोणता, कि जेव्हा तुम्ही देवाच्या विश्वासूपणाची साक्ष देणाऱ्या इतर कोणालातरी भेटता जेणे करून इतरांचा विश्वास वाढावा.


## प्रश्न आणि उत्तरे




1. देवाची सेवा करण्यापेक्षा तुमच्या योजना महत्वाच्या आहेत असे तुम्हाला केव्हा वाटले.
आपल्या जीवनासाठी देवाची काय इच्छा आहे हे समजणे कठिण आहे. आपण असे म्हणू शकतो कि देवाची सेवा करणे कि आपले स्वप्न पूर्ण करणे हा निर्णय घेणे कठिण आहे. जर आपण आपल्यासाठीच्या गोष्टींकडे देवाच्या दृष्टीने पाहिले तर आपला दृष्टिकोन बदलेल. आपले स्वप्न त्यागण्या संबंधी ते नाही; आपल्या जीवनासाठी देवाची योजना स्वीकारने शिकण्याबद्दल ते आहे.
आब्राहामाने त्याचे जीवन पूर्ण पणे बदलणारा निर्णय घेतला, कि सर्व काही सोडून त्याला माहित नाही अशा ठिकाणी जावे. परंतू त्याच्याठायी विश्वास होता कि ह्या गोष्टीवर भरवसा ठेवावा कि देवाची योजना अधिक चांगली आहे आणि पित्याची इच्छा पूर्ण करून सुध्दा त्याचे स्वप्न पूर्ण होवू शकत होते.
2. देवासाठी तुमचे प्रेम व्यक्त करण्यासाठी तुम्हाला कधी सक्ती वाटली काय?
जेव्हा आपण देवाच्या गोष्टींना महत्व देतो आणि त्या मनापासून करतो तेव्हा ते असे काही तरी असते जे त्याच्या प्रती तुमची प्रिती आणि आभार व्यक्त करते. आपण आपल्या कृतीतून हे सांगत असतो कि आपण आपल्या पित्यावर अवलंबून राहण्यास तयार आहोत. उदा. श्रीमंत मनुष्य त्याच्या संपत्ती पासून दूर जावू शकला नाही कारण ती गोष्ट त्याच्यासाठी सर्वात महत्वाची होती.
3.देवाला माझे जीवन हवे आहे हे मी कसे जाणू शकतो?

देवाकडे दररोज पाहिल्याने आपण ओळखू शकतो कि आपण काय करावे किंवा कसे वागावे अशी त्याची इच्छा आहे.  लक्षात ठेवा, त्याची इच्छा आहे कि तुमच्या बरोबर वयैक्तिक संबंध ठेवावे आणि तुमच्या व त्याच्या मध्ये अडखळण असणारी प्रत्येक गोष्ट तो दूर करू इच्छितो. स्वतःची तुलना इतर लोकांबरोबर करू नका; देव वयैक्तिक रित्या कार्य करतो. त्याचे उद्देश नेहमी असे असतील कि आपण आपल्या जीवनातील प्रत्येक पैलूत दररोज चांगले व्हावे.

## कोड्यांची उत्तरे






## खेळ

***लिंबू खेळ***

मुलांना दोन संघात विभागा. सुरवात रेषेच्या थोडे दूर फळा किंवा कागदाचे मोठे पत्रक लावा. प्रत्येक संघाच्या पहिल्या मुलाला पेन्सील आणि चमचा दया, जो तिने केवळ तोडांत धराव लिंबू सह. जेव्हा पुढारी ‘‘जा’’ असे ओरडेल तेव्हा त्याने फळयाकडे जावे, लिंबू खाली न पाडता आणि पवित्र शास्त्रातील वचनाचा पहिला शब्द लिहावा. मग तिने तिच्या संघाकडे परत जावे आणि पेन्सील आणि लिंबू पुढील खेळाडूला द्यावी. जो संघ पूर्ण वचन संदर्भासहीत अचूक पणे सर्वात आधी लिहेल तो जिंकेल.






## गृहपाठ

तुम्ही खूप महत्व देत असलेली एखादी खेळणी किंवा वस्तू निवडा (जर तुम्हाला खरंच हवं असेल तर) आणि ज्या कोणाजवळ ज्यास्त खेळणी नाहीत अशा कोणाला तरी ते दया. जर ह्या आठवडी तसे करणे तुमच्यासाठी कठिण होते तर पुढील आठवडी पुन्हा प्रयत्न करा. तुम्ही तसे केल्या नंतर, तुमच्या रविवारच्या वर्गाला ते सांगा. ते कसे होते?



**येशूने 10 कुष्ठरोग्यांना बरे केले: लूक 17:11-19**

नाटक( भाग 1)

प्रतिनिधी मदत मागत आत येतो. तो म्हणतो कि त्याच्या आईवडीलांनी त्याने येशूला ग्रहण केले तेव्हा पासून त्याच्या वागण्यात पुष्कळ बदल पाहिला आहे, जे चांगले आहे. परंतू तो वाईट शब्द बोलणे थांबवू शकत नाही; ते त्याच्या तोंडातून निघतातच. अधिक बलवान होण्यासाठी आणि ह्या गोष्टी थांबविण्यासाठी तो काही करू शकतो काय? तपासक सांगते कि कशा रितीने ती घरकाम करण्यास धडपडते आणि बरेचदा ते करत नाही, जे तिच्या आईसाठी निर्दयी असते, तपासाकाली सुध्दा अधिक चांगले करायचे आहे. काही दिवसाआधी तिने तिचे पवित्र शास्त्र तिच्या बिछान्याजवळ ठेवले आणि ती ते दररोज सकाळी बिछान्यातून बाहेर निघण्याआधी वचते आणि प्रार्थना करते आणि देवासाठी गीत गाते. ते साधे आहे, परंतू हळूहळू ती अधिकाधिक चांगली होते आणि कारण देवाबरोबरची तिची वेळ तिला सकाळची सुरवात चांगल्या वृत्तीने करण्यास मदत करते. प्रतिनिधी निर्णय घेतो कि तो तसे करेल. तपासक त्याला प्रोत्साहित करतो कि त्याने ते दिर्घकाळासाठी सुरू ठेवावे, कारण बदल हा हळू हळू होतो. ते त्यांच्या कामगिरीसाठी भूतकाळात जातात.

धडा

येशूला पुन्हा एकदा ‘‘विदेश्यांसाठी’’ कळवळा येतो. लोकांना वाटले कि येशूने ह्या लोकांबरोबर संपर्क ठेवू नये परंतू येशूने तरीसुध्दा त्यांच्यावर प्रिती केली आणि त्यांना बरे केले.

लूक 17:11-19 वाचा

कोणताही समारंभ किंवा विधी किंवा प्रार्थना नव्हतीच येशूने त्यांना सूचना दिले कि त्यांनी जुन्या कराराचा नियम पाळण्यासाठी याजकांना जाऊन दाखवावे. येशूने जे सांगितले ते जेव्हा ह्या 10 लोकांनी केले तेव्हा ते ह्या भयंकर आजारातून बरे झाले. येशूच्या साध्या सूचनांचे पालन केल्याने त्यांच्या जीवनात अविश्वसनीय आर्शीवाद प्राप्त झाला. एक मनुष्य येशूकडे परत आला आणि त्याची भक्ति केली, चमत्कारासाठी येशूचे आभार मानले. आपल्या जीवनामध्ये देवाचे आर्शीवाद प्राप्त करणे आणि देवाला त्याचे श्रेय न देणे सोपे आहे! म्हणून आपण ह्या गोष्टीतून कमीत कमी तिन गोष्टी शिकू शकतो. पहिली, कि आपल्याला आवश्यक असलेल्या गोष्टी देवाला मागणे ठिक आहे, जरी आपण त्याच्या आर्शीवादासाठी पात्र नाही असे आपल्याला वाटत असले तरी.
दुसरी, जेव्हा देवा सूचना देतो तेव्हा आपण त्या सूचना पाळल्या पाहिजे.
तिसरी, आपण नेहमी देवाचे आभार मानले पाहिजे आणि देवाने आपल्यासाठी जे केले ते इतरांना सांगितले पाहिजे!

पाठांतर वचन

फिलिप्पैकरांस पत्र 4:6 " कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा."

## नाटक (भाग 2)

त्यांच्या कामगिरी वरून परतल्यावर, त्यांना आश्चर्य वाटले कि येशूने इतक्या साध्यापणे कुष्ठरोग्यांना कसे बरे केले. प्रतिनिधी उल्लेख करतो कि साध्या सूचना पाळल्याने खरोखर मोठे बदल होतात. तपासकाच्या लक्षात येते कि तिच्या मध्ये होणाऱ्या हळूवार बदलांसाठी जे तिला तिच्या आईला घरकामात मदत करण्यासाठी मदत करतात त्यासाठी तिने देवाची स्तुति केली पाहिजे व त्याचे आभार मानले पाहिजे. पुढारी उल्लेख करतो कि कशा प्रकारे त्याने त्या दोघांच्याही जीवनात सकारात्मक बदल पाहिले आहेत आणि त्या गोष्टींसाठी देवाचे आभार मानतो.

## न्याय

इतरांच्या जीवनात देव काय करत आहे त्याकडे लक्ष दया आणि त्यांच्या बरोबर आनंद करा!


## जीवनचरित्र (परिचारिका)

परिचारिका ती व्यक्ति आहे जी आजा-यांची, जखमींची, घायळांची आणि मरत असलेल्यांकडे जाते किंवा त्यांची काळजी घेते. परिचारिकेला डॉक्टरच्या सूचना पाळाव्या लागतात. जिथे नियुक्त केल्या जाते तिथे परिचारिका सर्व वयोगटातील लोकांची वयैक्तिक किंवा आरोग्य संघांच्या सहकार्याने काळजी घेते.

जवाबदा-याः आजारी लोक जिथे आहेत तिथे थेट आणि सखोल सेवा ह्यावर त्यांचे काम केंद्रित असते. दिर्घकालीन आरोग्य आणि जीवनमान सुधारणा, आणि रूग्नाच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांची भूमिका महत्वाची असते. परिचारिकेने वैद्यकिय निर्देशाचे पालन केले पाहिजे आणि प्रत्येक रूग्णासाठी योग्य पोषण दिले पाहिजे.

संधीः ज्या लोकांची ते सेवा करत आहेत त्यांचा विश्वास संपादन केल्याने ते त्यांच्या जीवनावर मोठया प्रमाणात परिणाम करू शकतात. ह्या शिवाय त्यांच्या कार्यात तांत्रिक आणि सिंध्दांतीक ज्ञाना सोबत, त्यांनी सेवाभावी वृत्ती ठेवणे महत्वाचे आहे. त्यांचे ज्ञान, समर्पण आणि एकनिष्ठता इतरांसाठी उपलब्ध करून देणे ह्यासाठी रूग्णांच्या प्रती उच्च दर्जाची सहानूभूती आणि सहनशीलतेची मोठी मात्रा लागते.

## प्रश्न आणि उत्तरे



1. मला नेहमीच निर्देशाचे पालन करावे लागेल काय?

मी हे लक्षात ठेवले पाहिजे कि प्रत्येक वेळेस माझ्याकडे नविन साहित्य किंवा खेळ असला तर मी त्यातील सूचना वाचायला हव्या ह्यासाठी कि त्याचा जास्तीत जास्त फायदा मला मिळावा. म्हणून मला समजते कि सूचना ह्या मदतीच्या असतात, येशूने बार्तीमयला तळयावर जाऊन त्याने त्याच्या डोळयाला लावलेला चिखल धुवायला लावले, बार्तीमय ने सूचनांचे पालन केले आणि दृष्टि परत मिळविली. कल्पना करा कि जर त्याने त्या सूचनांचे पालन केले नसते तर काय झाले असते. हे कळणे चांगले आहे कि त्याने त्याचे पालन केले आणि तो निरोगी झाला.


2. माझे आईवडील ह्या गोष्टीवर भर का देतात कि मी आभारी असावे?


ही ती वृत्ती आहे जी आपण दररोज वाढीस लावली पाहिजे, कदाचित जेव्हा तुम्ही तुमच्या आईवडीलांचे ऐकता किंवा तुमचे अधिकारी तुम्हाला आभारी असण्यासाठी सांगतात ते ऐकता तेव्हा तुम्हाला ते आवडत नाही. जो धडा आपण ऐकला त्याचे विश्लेषण करा कि येशूने 10 कुष्ठ रोग्यांना बरे केले आणि त्यातील केवळ एक, ज्याच्या लक्षात आले कि तो बरा झाला आहे तो त्या चमत्कारासाठी त्याला आभार मानण्यासाठी परत आला. येशू त्याला म्हणतोः बाकिचे कुठे आहेत, मी 10 ला बरे केले होते ना? हे आपल्याला दाखविते कि जर आभारी असण्याची वृत्ती त्याच्यासाठी चांगली होती, हे महत्वाचे आहे कि आपण सुध्दा आभारी असावे.


3. जर माझ्या आईवडीलांचे निर्देश देवाच्या विरूध्द असतील तर मी त्यांचे ऐकावे काय?

पवित्र शास्त्र सांगते कि सर्व अधिकार देवाकडून येतो; ह्याच्या आधारे आपले आईवडील आपल्याला जे सांगतात ते आपण करावे, ही गोष्ट लक्षात ठेवत कि आपण देवाला दु:ख होईल असे काहीही करू नये. जर आपले आईवडील आपल्या चर्चला जाण्याची मनाई करतात तर देवाचे वचन ऐकण्याचे इतर पर्याय आहेत. वेळ येईल जेव्हा आपण निर्णय करू शकू, आपल्या आईवडीलांचा मान राखू या आणि देवाची आज्ञा पाळू या. दोन्ही गोष्टी एकत्र करता येतील

## कोड्यांची उत्तरे









## खेळ

***संगीतमय अलिंगन***




गटाला वयैक्तिक किंवा जोडीत विभागा जोवर मोठा समूह तयार होत नाही. जोरदार संगीत वाजवा जेव्हा भाग घेणारे खोलीमध्ये उडया मारतात. जेव्हा संगीत थांबते तेव्हा, प्रत्येक सहभागीने दुसऱ्याला अलिंगन दयावे आणि त्यांचे नाव सांगावे. संगीत सुरू राहिल आणि जेव्हा पुढील वेळेस ते थांबेल तेव्हा तीन मुले एकमेकांना अलिंगन देतील, आणि त्यांचे नाव सांगतील तो पर्यंत जेव्हा ते सर्वच एका मोठया संगीतमय अलिंगनात एकत्र होत नाहीत.




## गृहपाठ

ज्या गोष्टी तुम्ही देवाला मागीतल्या आणि ह्या आठवडयात ज्या तुम्हाला मिळाल्या त्याचा विचार करा आणि जर त्याने तुम्ही जे मागितले त्याचे उत्तर दिले आहे, तुमच्या कुटुंबासाठी, किंवा तुमच्या जीवनासाठी, तर देवाचे आभार मानन्यासाठी काही वेळ घ्या, आणि सन्डेस्कूल मध्ये शिक्षकाला ते सांगा.

# येशू सारखे नम्र असा

05



**येशूने त्याच्या शिष्यांचे पाय धुतलेः योहान 13:3-17**

## नाटक (भाग 1)

आज कामगिरी नंतर त्यांना यंत्र स्वच्छ करायचे आहे. प्रतिनिधीने सलग दोनदा यंत्र स्वच्छ केले, आज तपासकाची पाळी आहे. तिला ते करण्याची इच्छा नाही ती काम करण्यापासून पळ काढण्याचा प्रयत्न करते. शिवाय ती संघाची वरिष्ठ सदस्य आहे, म्हणून प्रतिनीधीने ते पुन्हा स्वच्छ करावे. पुढारी तीला सांगतो कि आज तिची पाळी आहे आणि ते परत आल्यावर तिने ते केले पाहिजे. ती सहमत होते.

## धडा

येशू त्याच्या शिष्यांबरोबर रात्रीचे भोजन करत होता जेव्हा त्याने शिष्यांसाठी इतकी धक्कादायक अशी गोष्ट करण्याचे ठरविले कि पेत्राने त्याला थांबण्यास सांगितले. चला आपण पाहू या.

योहान 13:3-17 वाचा

येशूने जे केले ते केवळ चाकर करीत असत. लूक 22:27, येशूने शिष्यांना विचारले मोठा कोण आहे, जो सेवा करतो कि ज्याची सेवा केली जाते. नक्कीच ज्याची सेवा केली जाते तो. परंतू येशू म्हणाला, ‘‘मी तुमच्या मध्ये सेवा करणारा असा आहे,’’ त्याने त्याच्या कृतीने ते दाखवून दिले. जो शिष्य त्याला फसविणार असे त्याला माहित होते त्याचे सुध्दा त्याने पाय धुतले.

येशूने त्याची नम्रता इतर प्रकारे सुध्दा दाखविली. तो स्वर्ग सोडण्यासाठी तयार होता आणि पृथ्वीवर बाळ म्हणून आला! त्याच्या मालकिचे घर किंवा प्रौढपणी त्याचे स्थायी घर नव्हते. त्याच्याकडे सेवक सुध्दा नव्हते. त्याने मागणी केली नाही कि लोकांनी त्याची आराधना करावी. त्याच्या खटल्याच्या वेळी त्याच्यावर होणाऱ्या खोटया दोषारोपांना त्याने प्रतिसाद दिला नाही. त्याची थट्टा करणाऱ्या शिपायांचा त्याने विरोध केला नाही.

आणि शेवटी त्याने आपल्यासाठी, त्याचे मेंढरे हयांच्यासाठी आपला प्राण दिला. फिलिप्पै 2:8 म्हणते, ‘‘आणि मनुष्यप्रकृतीचे होऊन त्याने मरण आणि तेहिं वधस्तंभावरचे मरण, सोशिले येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वतःला लीन केले.’’ येशू म्हणाला आपण त्याचे उदाहरण घेतले पाहिजे आणि सर्वांचा सेवक झाले पाहिजे. केवळ आपल्याला जे आवडतात त्यांचेच नाही, तर सर्व लोकांचे ज्यांना देवाने निर्माण केले आहे.

## पाठांतर वचन

फिलिप्पैकरांस पत्र 2:3-4 " तट पाडण्याच्या अथवा पोकळ डौल मिरवण्याच्या बुद्धीने काहीही करू नका, तर लीनतेने एकमेकांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ माना. तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका, तर दुसऱ्यांचेही पाहा."

## नाटक (भाग 2)

त्यांच्या प्रवासावरून परत आल्यावर ते चर्चा करतात कि कसे येशू जो विश्वाचा राजा आहे, तो गुडघ्यावर झाला आणि त्याने त्याच्या शिष्यांचे पाय धुतले. ते भयंकर असे काम वाटत होते! काही शिष्यांच्या केसाळ पायांवर मस्से सुध्दा होते! आणि सर्व पायांची दुर्गंधी येत होती. तपासक यंत्र स्वच्छ करण्याच्या तिच्या वृत्तीसाठी क्षमा मागते. पुढारी दुसऱ्या संधीचा विचार करतो, आणि घोषीत करतो कि

आज यंत्र तो स्वच्छ करेल, आणि तपासक पुढील वेळी ते स्वच्छ करू शकते. तापसक ऑपरेशन कंट्रोल डेस्क स्वच्छ करण्यासाठी स्वतः पुढे येतो, प्रतिनिधी मशीनच्या भागातील सुटे भाग ग्रीसने स्वच्छ करण्यासाठी स्वयंस्फूर्तिने पुढे येतो.

## न्याय

येशू लोकांची सेवा करण्यासाठी आला आणि आपण त्याचे अनुसरण केले पाहिजे. आपण नेहमी इतरांची सेवा करण्याचे साधे मार्ग शोधले पाहिजे त्यांची सुध्दा जे आपल्याला दुःख देतात.

## जीवनचरित्र (संदेशवाहक)

संदेशवाहक तो व्यक्ति आहे ज्याचे काम आवश्यकतेनुसार पत्रव्यवहार किंवा खोके गोळा करून ते निर्देशित स्थानापर्यंत पोहचविणे आहे. ते एकाच किंवा दुसऱ्या शहरात सुध्दा असू शकते.

जवाबदा-याः संदेशवाहक हा प्रामाणिक असणे आवश्यक आहे जो कार्य सुरक्षितपणे पूर्ण करेल. त्यांच्या संपर्काचे जाळे वाढविण्यासाठी आणि तेणे करून अधिक काम प्राप्त करण्यासाठी त्यांच्या ग्राहकांचा विश्वास मिळविणे महत्वाचे आहे.

संधीः जेव्हा त्यांनी लोकांचा विश्वास मिळविला आहे, तेव्हा ते त्यांच्यावर वयैक्तिक छाप सोडू शकतात, जे नेहमी आठवणीत राहिल. ह्याचा फायदा घेण्यासाठी जवाबदारीने सेवा पूरवा, प्रत्येक वितरणामध्ये सर्वोत्तम ते करत.

सध्या लोकांचा भरवसा गमाविला गेला आहे. अनेक घोटाळयांच्या किंवा फसवणूकिच्या परिस्थिती मूळे व्यक्तिसाठी संदेशवाहक सेवा पहिल्यांदा वापरतांना काळजी करणे थांबविणे कठिण आहे. संदेशवाहक ठरवित असतो कि ती परिस्थिती पूढे सुरू राहिल कि बदलेल.

## प्रश्न आणि उत्तरे

1. नम्र होण्यासठी मी कोणीती कृती केली पाहिजे?

अनेक परिस्थिती आहेत ज्यात आपण नम्र होण्याचा ‘‘सराव’’ करू शकतो. जेव्हा आपल्याकडे काही निवडण्याची संधी असते तेव्हा बढाई मारण्यापेक्षा साधे व्हा. इतर लोक तुमच्या पेक्षा महत्वाचे आहेत असा विचार करणे दुसरा मार्ग आहे. तुमच्या आधीच्या दिवसाच्या प्रत्येक कृतीचा आढावा घ्या आणि तुम्हाला समजेल कि तुम्ही उद्ध्ट होते कि तुम्ही नम्र होते.


2.जेव्हा लोक माझ्या बद्दल खोटे बोलतात तेव्हा मी माझ्या प्रतिष्ठेसाठी लाढायला पाहिजे काय?

ह्या परिस्थितीमध्ये असणे खूप कठिण आहे. सहसा आपण स्वतःचा बचाव करतो आणि आपल्याबद्दल जे बोलले जात आहे ते नाकारतो. खटल्याच्या वेळेस येशू ज्या परिस्थितीतून गेला ते आपण पाहतो, ते अन्यायी गोष्टींचा आरोप त्याच्यावर करत होते जेणे करून त्याला ते मारू शकतील. परंतू त्याने काहीच म्हटले नाही. लोकांना वेळेनुसार कळू दया कि ज्यागोष्टी ते तुमच्या बद्दल बोलत आहेत त्या खोटया आहेत, त्याच्या बद्दल न बोलता आणि तुम्हाला तुमच्या प्रती लोकांच्या चांगल्या प्रतिक्रिया प्राप्त होतील.


3.माझ्या मित्रांना आणि भावांना नम्र होणे मी कसे शिकवू शकतो?

सर्वात उत्तम गोष्ट ही आहे कि ते आपल्यात ते पाहतील. शब्दांचा चूकिचा अर्थ काढला जाऊ शकतो, परंतू आपल्या कृती स्वतः बोलतात. एखाद्या विषयात जे निपून आहेत त्यांचे कौतुक करणे आणि मदत मागणे हे नम्रतेची कृती आहे. स्वतः असा.

## कोड्यांची उत्तरे








## खेळ

***आश्चर्य डबा***



एक डबा किंवा पिशवी तयार करा ज्यात काही कार्य लिहिलेले गुंडाळलेले कागदं आहेत. उदा. पवित्र शास्त्रातील ओवी म्हणा, गीत गा, तुमच्या रंगकांडया वाटून घ्या, तुमची आवडती खेळणी काही वेळसाठी इतरांबरोबर वाटा, इतर गोष्टींसारखे. सहभागी गोल तयार करीत तो डबा एका हातातून दुसऱ्या कडे देतात जो पर्यंत विशिष्ट इशारा होत नाही. ज्या व्यक्तिकडे त्या वेळेस तो डबा राहिल तो त्यातील एक कागद काढतो आणि दिलेली कामगिरी करतो. सर्व कागदं संपेपर्यंत खेळ सुरू राहिल. जो सहभागी शेवटची कामगिरी करेल तो आता खेळाचे पुढारी पण करील.



## गृहपाठ

तुमच्या घरी किंवा शाळेत कोणातरीसाठी त्यांनी कामासाठी तुमची मदत न मागता काम करा. शाळेत, जी खोली तुम्ही स्वच्छ केली नाही तिच्यातून कचरा उचला.

# येशुसारखी कळकळ असलेले

06

**येशूने मेज पलटविलेः मार्क 11:15-17 योहान 2:13-17**



नाटक( भाग 1)

प्रतिनीधी संघाला सांगतो कि तो त्याच्या बहीणी बरोबर एका लहान व्यवसायाची संधी पाहत आहे. ती एक कलाकार आहे आणि भिंतीवरील सुंदर सजावट तयार करू शकते आणि काही सजावटी ज्या तिने तयार केल्या त्यावर पवित्र शास्त्रातील वचनं आहेत. तो ते विकण्याची योजना करत आहे. त्यादिवशी त्यांने पाहिले कि कोणीतरी धार्मिक वस्तूवर अधिक किंमत लावली कारण ते धार्मिक आहेत आणि म्हणून ते लोकांना देवाच्या जवळ आणतात. तो योजना करत आहे कि तो पवित्र शास्त्रातील वचनांच्या भिंतीवरील लटकणासाठी अधिक किंमत लावेल. तपासक म्हणते कि किंमत वाढविणे चांगली कल्पना नाही. परंतू प्रतिनिधीची खात्री पटत नाही, ते काळामध्ये मागे जातात.

धडा

येशूने गाढवावर बसून येरूशलेमेत प्रवेश केला आणि लोक त्याची स्तुती करीत गीत गात होते आणि रस्त्यावर त्याच्या समोर त्यांचे वस्त्र पसरवित होते. हे चिन्ह होते कि तो राजा आहे! यहूदी चांगले करीत होते. परंतू जेव्हा येशूने मंदीराला भेट दिली, तेव्हा त्याला दिसून आले कि प्रार्थना व देवाची भक्ति करण्याएवजी लोक व्यापार करित होते आणि याजक त्याची परवांगी देत होते!

मार्क 11:15-17 वाचा

जो शिक्षक प्रिती आणि नम्रता शिकवित होता त्याच्या कडून ही हिंसक प्रतिक्रिया वाटत होती. परंतू ह्या गोष्टी मध्ये इथे अधिक काही आहे. जुन्या करारातील नियमामध्ये हे आवश्यक होते कि लोकांना वर्षातून एकदा मंदीराला भेट द्यावी आणि त्यांनी वाढविलेले आणि पाळलेले यज्ञ करावे. जर आवश्यक असलेले यज्ञ मंदीरात आणणे कठिण असेल तर ते यज्ञासाठी यरूशलेम मधून काही विकत घेवू शकत होते. व्यापा-यांनी ह्या वस्तू विकण्यासाठी मंदीराच्या आवारात दुकाने उघडिली. दुर्दैवाने ते हे यज्ञ खूप ज्यास्त किंमतीत देत होते कारण प्रवाश्यांना ते इतर ठिकाणावरून घेणे कठिण झाले असते. ते देवाच्या स्वतःच्या मंदीरात लोकांचा गैरफायदा घेत होते! ह्या मूळे येशूने त्यांना लुटारू म्हटले.

देवाला शोधण्याच्या मध्ये जेव्हा कोणी येते त्यापेक्षा अधिक काहीही देवाला चिड आणत नाही, कारण तो लोकांवर प्रिती करतो आणि त्यांच्या बरोबर राहू इच्छितो. मत्तय 23:13 मध्ये येशूने पुन्हा एकादा धार्मीक पुढा-यांना लोकांना स्वर्गाच्या बाहेर ठेवल्या बद्दल ताडण केले. लोकांवर नियमांचा भार देऊन किंवा त्यांचा गैरफायदा घेऊन कोणाला देवाला शोधण्याच्या मार्गात येवू नये तर आपण त्यांच्यासाठी देवाला शोधणे सोपे करू या.

पाठांतर वचन

मत्तय 23:13 “अहो शास्त्र्यांनो, अहो परूश्यांनो, ढोंग्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही लोकांना स्वर्गाचे राज्य बंद करता; तुम्ही स्वतःही आत जात नाही व आत जाणाऱ्यांनाही आत जाऊ देत नाही."

## नाटक (भाग 2)

येशूच्या दिवसामध्ये यरूशलेम वरून परत आल्यावर, मंदीरातील व्यापा-यांच्या प्रति येशूची प्रतिक्रिया पाहून प्रतिनिधी आश्चर्यचकित झाला. प्रतिनिधी पुढाऱ्याला विचारतो जो त्याला सांगतो कि देवाची इच्छा आहे कि आपण लोकांना त्याला शोधण्यासाठी मदत करावी, जेव्हा ते देवाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांना दूर सारू नये किंवा त्यांचा गैरफायदा घेवू नये. ह्याची काही वेळ चर्चा केल्यानंतर पुढारी प्रतिनिधीची मदत करतो कि त्याने नाफा मिळविण्याची त्याची वृत्ती बदलावी आणि त्याचा व्यवसायी लोकांना देवाला शोधण्याची संधी आहे असे त्याच्याकडे पहावे. तो निर्णय घेतो कि तो पवित्र शास्त्रातील वचन असलेल्या वस्तूवर सूट देईल आणि त्याच्या बहिणीला तशा आणखी वस्तू मागेल.

## न्याय


जे लोक देवाच्या नावाखाली गरीब लोकांचा गैरफायदा घेत होते त्याच्याशी येशू हिंसक रित्या वागला. जे स्वतःचा बचाव करू शकत नाही त्यांचा आपण बचाव करावा विशेषतः मंडळीत लोकांचा.

## जीवनचरित्र (सैनिक)

सैनिक, त्याच्या साधारण समजीत, एक अशी व्यक्ति आहे ज्याने स्वयंक सेवक म्हणून स्वतःचे नाव दिले आणि किंवा जो सर्वभौम देशाच्या सशस्त्र दलात अनिवार्य असलेल्यासेवेत भरती आहे. देशाचे आणि त्याच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शिपायाला प्रशिक्षण आणि संसाधन प्राप्त होतात.

जवाबदा-याः सैन्यदलात, शिपायांच्या गटात शिपाई विविध सेवेत विभागलेले असतात. उदा. पायदळ, चिलखत शास्त्र, तोफखाना, सैन्य पोलिस इ. सैनिकाकडे आज्ञापालन, सहकार्य आणि विवेकबुध्दीची उच्च भावना असते.

संधीः ख्रिस्ती सैनिकाकडे प्रामाणिक, परिश्रमी आणि दिलेल्या सूचनांकडे लक्ष देण्याची संधी असते. कुरकुर टाळणे, अफवा सुरू करणे किंवा पसरविणे टाळणे, आणि हे जाणणे कि चांगले मनोबल हे तुमच्या घटकाला अधिक प्रभावी आणि सन्मानास पात्र करते. सैनिक नेहमी इतरांना मदत करण्याचे, प्रोत्साहित करण्याचे आणि संघ म्हणून काम करण्याचे मार्ग शोधू शकतो. तुमच्या घटकावर तुम्ही महत्वपूर्ण प्रभाव पाडू शकता मग तुमची श्रेणी कोणतीही असो.



## प्रश्न आणि उत्तरे

1. जर मी माझ्या गोष्टींबद्दल उत्सुक आहे आणि देवाच्या सेवेसाठी नाही तर काय?

आपल्याला ज्या गोष्टी आवडतात त्यात आपण कसा उत्साह टाकतो हे पाहणे मनोरंजक आहे. जर आपण देवाची सेवा करतो तर त्याचा अर्थ हा आहे कि आपल्या जीवनात त्याचे स्थान जाणणे. जेव्हा आपण खेळाच्या संघाचा भाग असतो किंवा इतर काही गोष्टींचा, तेव्हा आपण तयारी करतो आणि प्रत्येक सभेला हजर राहतो. जेव्हा आपण जे काही करतो त्यात देवाला प्रथम स्थान असते तेव्हा आवश्यक ती वेळ देणे सोपे होते आणि नक्की ते कळकळीने किंवा उत्सुकतेने करणे व जे आपण करतो त्याचा आनंद घेणे सोपे होते.

2. कधी कधी मला वाटते कि मी स्वतःला फसवित आहे आणि मला ते आवडत नाही...

लक्षात ठेवा कि जेव्हा तुम्ही देवासाठी काही करता तेव्हा तुम्ही त्याची मदत मागू शकता. अनेक मुलं आणि मुली त्यांच्या मंडळीत इतके आरामदायी असतात कि त्यांना देवासाठी खरी कळकळ आवश्यक नाही. जगाच्या इतर भागात अनेकजण त्यांचे जीवन येशूसाठी देत आहेत. त्यांच्याकडे नक्कीच देवासाठी खरी कळकळ आहे. मी तुम्हाला आमंत्रित करतो कि तुम्ही अस्वस्थतेची ती भावना देवाला समर्पित करावी आणि देवाने त्याच्या सेवेसाठी तुम्हाला कळकळ द्यावी म्हणून त्याला मागावे.


3. मंदीरातून व्यापा-यांना बाहेर काढण्यासाठी येशूच्या रागाचे मी अनुकरण करावे काय?

कधी कधी आपण आपण अशा कृतीवर लक्ष केंद्रित करतो ज्या आपल्याला आपल्या इच्छेप्रमाणे करण्याची संधी देतात. त्या क्षणी येशू अस्वस्थ झाला कारण पित्याची भक्ती करणे ह्याला जे योग्य तितके महत्व दिले जात नव्हते. त्याचा राग परूशी आणि नियमशास्त्राच्या शिक्षकांच्या प्रति होता त्यांनी मंदीरामध्ये जे होवू दिले त्यासाठी. देव कदाचीत आपल्याला काही कठोर असे करायला सांगणार नाही. सावध असा कि इतरांना दुःख देणाऱ्या गोष्टी करू नये, कारण त्या देवासाठी महत्वाच्या आहेत.

## कोड्यांची उत्तरे









## खेळ

***माझ्याकडे आणा***

सहभागी स्वतःला लहान गटात विभागतात आणि गट समन्वयकापासून शक्य तितक्या दूर उभे राहतात. मग समन्वयक म्हणतो, ''माझ्याकडे .......आणा'' आणि जवळ असलेल्या वस्तूचे नाव घेतो. उदा. ''माझ्याकडे पुरूषाचे किंवा स्त्रीचे बुट आणा'' ( वस्तू वर्गखोलीत वस्तू असू शकतात). ज्या गोष्टीची मागणी केली जाते ती नेण्यासाठी संघ धावतो. तुम्ही ह्याची अनेकदा पुनरावृत्ती करू शकता, संघाला विविध वस्तू आणायला सांगून.






### गृहपाठ

देवासाठी तुमच्या प्रितीच्या वर असलेल्या आणि ज्या कदाचित देवासाठी तुमची कळकळ दूर करतात वस्तू किंवा लोकांची यादी तयार करा. (मैत्रीण, मित्र, शाळेचे काम, मोबाईल, खेळ, खेळणी, मित्रमंडळी) देवाला विनंती करा कि त्याच्या दृष्टीने पाहण्यासाठी त्याने तुम्हाला शिकवावे. आणि या आठवडयात देवाबरोबर बोलण्यासाठी अधिक वेळ घ्या.

# येशूचे हृदय उघडे झाले

07

**गेथसेमनी बागेत येशू: मत्तय 26:36-39,47-54**



## नाटक( भाग 1)

तपासक आज दुखी आहे. काल तिला कळले कि तिचा जवळची मैत्रीण जी हल्ली दुसऱ्या मुलीबरोबर ज्यास्त वेळ घालवित होती, तिने तिचा विश्वास तोडला आणि दुसऱ्या मुलीला तिच्या बद्दल वाईट गोष्टी सांगितल्या, तिच्या गुप्त गोष्टी सुध्दा. तपासकाला ते कळले कारण ती दुसरी मुलगी गुप्तता ठेवू शकली नाही आणि संपूर्ण शाळेला ते कळले. मग शिक्षकाने त्यांना कार्यसाठी एकत्र केले आणि तिला त्या मुलीसोबत एकत्र ठेवले! पुढारी आणि प्रतिनिधी तपासकाबरोबर दुःखी आहेत आणि तिला सांत्वन देण्याचा प्रयत्न करतात.

## धडा

मत्तय 26:36-39, 47-54 वाचा

येशू खरोखर दुःखी होता कारण पुढील काही तासात ज्या भयंकर गोष्टी त्याच्याबरोबर होणार होत्या त्या त्याला माहित होत्या. प्रथम, येशूने प्रार्थनेत देव जो पिता त्याला शोधले. जेव्हा आपण चिंतीत किंवा विस्कळीत असतो तेव्हा काय केले पाहिजे ह्याचे किती चांगले असे हे उदाहरण आहे! त्याच्या उदाहरणाचे अनुकरण करीत आपण क्लेशदायी क्षणांमध्ये असतांना देवाला गोष्टी बदलण्याची विनंती करावी परंतू त्याच्या इच्छेला शरण जावे, हा भरवसा ठेवत कि देवाच्या मनात आपले सार्वकालिक हित आणि आपल्या भोवताच्या लोकांचे सुध्दा हित आहे.

मग यहूदा, जो येशूने त्याचे उत्तम मित्र होण्यासाठी निवड केलेल्या लोकांपैकि एक होता त्याने त्या लोकांना येशूकडे सरळ आणले जे त्याची हानी करू इच्छित होते. हा फसवणूकिचा सर्वोच्च प्रकार होता, जे दुःख येशू आधिच अनुभवत होता त्याच्या वर हे अधिकच चिरगळणारे होते.

परंतू ह्या भयंकर वेळेस सुध्दा येशूने यहूदाला त्याचा ''मित्र'' असे म्हटले आणि एक मनुष्य जो येशूला इजा करण्यासाठी आला तो भांडणात घायळ झाला, येशूकडे ते भांडण थांबविण्याची आणि त्या मनुष्याला बरे करण्याची कृपा होती.

ही गोष्ट येशूचे हृदय खूप स्पष्ट दाखविते. येशूसाठी भयंकर दुःखाच्या वेळेस सुध्दा, तो दयाळूपणे वागू शकला आणि आपल्यासाठी आणि त्याला इजा करणा-यांसाठी सुध्दा त्याचे महान प्रेम व्यक्त करू शकला.

## पाठांतर वचन

लूक 6:27 " ''परंतु तुम्हा ऐकणाऱ्यांस मी सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा; जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा;"

## नाटक (भाग 2)

जेव्हा ते परत आले तेव्हा ते जे त्यांनी पाहिले त्याचे आश्चर्य करीत एकमेकांबरोबर चर्चा करत होते, कि कसे येशूने जे त्याला अटक करीत होते त्यांना कृपाळू वागणूक दिली. तपासक तिच्या परिस्थितीबद्दल विचार करते, शाळेतील मुलगी आणि तिच्या लक्षात येते कि ती परिस्थिती सारखीच आहे. ती संघाला सांगते कि कशा प्रकारे तिने त्या मुलीच्या गृहपाठा मध्ये काही चूकिचे उत्तरं पाहिले आणि

तिला तिची मदत करण्याची काहीही इच्छा नाही, तिला वाईट गुण मिळू दयावे म्हणून. परंतू आता तिच्या लक्षात आले कि तिने त्या मुलीची गृहपाठामध्ये मदत केली पाहिजे जरी तिने तपसकाला त्रास दिला तरी. ते अतिशय कठिण आहे, ज्यामूळे येशूने जे केले त्यासाठी ती अधिकच आश्चर्यचकित होती. संघ निर्णय घेतो कि एकत्र प्रार्थना करावी कि देवाने तपासकाला कृपाळू मुलगी होण्यास मदत करावी, हे जाणत कि येशूच्या मदतीने ते अशक्य ते सुध्दा करू शकते.

## न्याय


तुम्ही कधी असा मित्र प्राप्त केला का ज्याने इतर लोकांना तुमच्या बद्दल वाईट गोष्टी सांगितल्या? हे विश्वासघातासारखे वाटते कारण ते तसे आहे! इतर लोकांबद्दल नेहमी दयाळू गोष्टी बोलण्यासाठी कार्य करू या.

## जीवनचरित्र (फिजीओथेरपिस्ट)

फिजीओथेरपिस्ट आरोग्य व्यवसायीक आहे जो एकापेक्षा अधिक रोगनिदान स्थितीचे निदान, बचाव आणि उपचार हे कार्य करतो (काही आजार व गतिशीलता ह्याशी संलग्न लक्षणांचा संच) जो विकास सहज करतो आणि औषधांच्या गरजेशिवाय दुखण्याने प्रभावित भागाची रोगमुक्ती करण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

जवाबदा-याः डॉक्टर किंवा नर्स प्रमाणे, ते त्यांच्या कडे मोठे समर्पण, आणि रूग्णांसाठी सहानुभूती असावी. फिजीओथेरपिस्ट मालीश करणारा नसतो, परंतू त्याच्याकडे विद्यापीठाचे प्रशिक्षण असते आणि तो आजाराचा उपचार व प्रतिबंध, उष्णता, थंडी आणि पाण्याची थेरपी किंवा शरीरिक पुर्नवसनाच्या उपचार पध्दतीने करण्याचा प्रयत्न करतो.

संधीः एक खिस्ती फिजीओथेपिस्टने रूग्णांना डॉक्टर व इतर वैदयकिय कर्मचा-यांबरोबर चांगले काम करण्यासाठी आणि उपचार आणि प्रक्रिया अदयावत ठेवण्यासाठी उत्तेजन दयावे. फिजीओथेरपिस्ट अनेक रूग्णांच्या त्यांच्या गरजेच्यावेळी संपर्कात असल्यामूळे साधे समोपदेशन आणि कुटुंब व मित्र हयांना मदत करणे ह्यासाठी महान संधी असतात.



## प्रश्न आणि उत्तरे

1. देव मला वाईट गोष्टींपासून सोडवू शकतो काय?

नक्कीच, आपल्यासाठी जे उत्तम ते त्याला पाहिजे आहे; आपण प्रत्येक जण वेगवेगळया प्रक्रियेतून जात असतो आणि ''वाईट गोष्टी'' ज्या आपल्या बरोबर घडतात त्या आपल्या जीवना देवाला जे हवे ते प्राप्त करण्यासाठी घडू शकतात. जेव्हा आपल्याला नकारात्मक अनुभव येतो तेव्हा ते का घडत आहे हे समजणे कठिण असू शकते. जर आपण स्वतःला ''का'' हा प्रश्न विचारला तर आपण आपली अभिमुखता गमाविली आहे. ह्या जगात चांगल्या व वाईट गोष्टी घडत असतात. येशूसुध्दा वधस्तंभावर जाण्याआधी त्याचे दुःख टाळू शकला नाही. त्याच्या वयैक्तिक प्रक्रियेत एक पाऊल पुढे घेण्यासाठी त्याला ते जगावे लागले. आपल्या संबंधी सुध्दा तसेच आहे, देवाकडे आपल्यासाठी जे जीवन आहे त्यात आपण पुढे पाऊल टाकू शकतो.

2. विश्वासघाताची क्षमा करणे कठिण आहे. मी त्याची क्षमा कशी करू शकतो?

ते आपल्यातील प्रत्येकावर कसा परिणाम करेल हे आपल्यावर अवलंबून आहे. येशूने त्याच्या स्वकियाकडून विश्वासघात सहन केला; कोणीतरी जो नेहमी त्याच्या सोबत असायचा. परंतू विश्वासघाताच्या वेळेस यहूदाबद्दल त्याला राग किंवा त्रास नव्हता. त्याला माहित होते कि त्या परिस्थितीचा परिणाम आपल्यातील प्रत्येकाच्या फायदयासाठी होता. येशूला माहित होते कि लोकांच्या मनात काय आहे. (योहान 2:26) त्यात विश्वाघाताचा समावेश असावा. आपल्याला ही ते माहित असावे आणि हे कि विश्वासघतक्यालाही क्षमा करणे शक्य आहे.

3. मी माझे हृदय बरे करू शकतो काय?

आपण ते करू शकतो, परंतू जेव्हा आपले हृदय खूपदा दुखावले गेले असते तेव्हा आपले हृदय बरे करणे कठिण असते. ह्या गोष्टी आपण करतो किंवा करण्याचे थांबवितो त्या हे दाखवितात कि आपले हृदय कसे आहे. जेव्हा येशूचा विश्वास घात करण्यात आला तेव्हा ह्या काही शंका नाही कि त्याला निराशा वाटली असेल, परंतू त्या क्षणी तो नम्र होता आणि एका पहारेकऱ्याचा त्याला कळवळा आला जो त्याला पकडत होता. त्याने पेत्राने कापलेला त्याचा कान पुन्हा लावला. मला खात्री नाही कि आपणही तसेच वागलो असतो. त्याने त्याच्या कृतीने हे दाखवून दिले कि त्याचे हृदय खराब झालेले नाही.

## कोड्यांची उत्तरे




| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | सा | र्व | का | त्रू | लि | क | स्प |
| त्र | श्वा | नि | रो | गी | प | णा | ष्ट |
| इ | च्छा | स | न | इ | प | नु | ता |
| नु | ब | ष्ट | घा | ल | ऐ | क | तो |
| हृ | शू | रे | गू | व | लि | सा | ये |
| द | स्प | चां | क | का | श | न | शू |
| य | हू | दा | र्व | र | त्रू | च्छा | त्र |
| क | ता | सा | शो | ध | णे | मि | हू |



तुम्ही जो विश्वास ठेवता त्याच्या आधारे प्रश्नांची उत्तरं द्या.

1. तुमच्या सर्वात चांगल्या मित्राचे नाव काय आहे? यासमयी
2. जर तुमच्या मित्राने तुमचा विश्वासघात केला तर तुम्ही काय कराल? मी दुःखी आहे
3. तुमच्या मित्राने पैशासाठी तुम्हाला विकले तर तुम्ही काय कराल किंवा जर तुमच्या बद्दल खूप वयैक्तिक गोष्ट सांगितली तर? मला विश्वासघात व फसवणूक झाल्यासारखे वाटते
4. येशूने शिपायाचा कान का बरा केला असे तुम्हाला वाटते? कारण ह्या सोबत, येशूने सर्वांसाठी अमर्याद प्रिती व मैत्री दाखविली
5. येशूने विश्वासघाताची क्षमा केली तशी तुम्ही करू शकता काय? निश्चीत, होय येशूने मला क्षमा केली आहे. मी ते का करत नाही?
6. आपण प्रार्थना केव्हा करावी? कोणत्याही वेळी, जेव्हा आपल्या बरोबर चांगल्या व वाईट गोष्टी होतात.




यायला सांगा. जेव्हा स्वयंसेवक बाहेर आहे तेव्हा बाकि सहभागींनी त्याच्या साठी/ तिच्यासाठी व्यवसाय शोधावा. ते वर्गातील धडयांमध्ये पहिलेले जीवनचरित्र असू शकते. जेव्हा स्वयंसेवक परत येतो तेव्हा सहभागी त्या व्यक्तिच्या कृतीचा अभिनय करतात. स्वयंसेवकाने कृतीच्या आधारे त्याच्यासाठी/तिच्यासाठी निवडलेला व्यवसाय ओळखावा.




### गृहपाठ

ह्या आठवडी जर कोणी अन्यायाने तुम्हाला दुखाविले, फसविले किंवा तुम्हाला रागाविले तर भांडू नका. शांत रहा आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करा आणि देवाने तुम्हाला शांती द्यावी म्हणून मागा. तुम्हाला कसे वाटले ह्या बद्दल तुमच्या संडेस्कूल शिक्षकाबरोबर बोला.

# अन्याय 08



**येशूवर खटलाः मार्क 14:57-65, 15:1-15**

## नाटक( भाग 1)

प्रतिनिधी आज रागात आहे. तो संघाला सांगतो कि शाळेतील फूटबॉल कोणीतरी घेतला आहे, आणि ते सर्व त्याचा दोष त्याच्यावर लावत आहेत. त्याने नक्कीच तो घेतला नाही! त्याने कोणाला तरी असे म्हणतांना ऐकले कि त्यांना वाटते कि तो ख्रिस्ती आहे म्हणून त्याने तो घेतला, जे त्याच्यासाठी अधीकच त्रासदायक होते. तो पुढारी आणि तपासक हयांच्या समोर स्वतःचा बचाव करतो. पुढारी त्याच्यावर विश्वास ठेवतो आणि ते काळात मागे जाण्याआधी त्याला शांत करतो.

## धडा

मार्क 14:55-65, 15:1-15 वाचा

येशू दोष रहित होता. त्याच्या बद्दलच्या लबाडीवर सुध्दा विश्वास ठेवता येत नव्हता. येशूने शेवटी त्याच्यावर दोष लावणा-यांची मदत केली हे सांगून कि तो मसीहा होता, जे खरे आहे. धार्मीक पुढा-यांना वाटले कि ते मरण्यासाठी पूरेसे आहे. त्यांना कोणालाही मारण्याचा अधिकार नव्हता म्हणून त्यांनी येशूला रोमी पुढारी पिलाताकडे पाठविले, परंतू पिलाताला कळले कि येशू प्रांजळ आहे. तरी यहुदी पुढा-यांनी जमावाला राजी केले कि त्यांनी येशूचे मरण मागावे.

ह्या सर्वांत येशूने स्वतःचा बचाव केला नाही. कदाचीत जर तो बोलला असता तर त्याला मारले गेले नसते. परंतू येशूला माहित होते कि हे घडले पाहिजे जेणे करून आपण वाचविले जावे.

दोषी व्यक्तिला शिक्षा देणे योग्य व न्याय आहे. परंतू येशूने कधीच पाप केले नाही आणि तरी सुध्दा शक्य तितक्या वाईट रित्या त्याला शिक्षा करण्यात आली. त्याने आपल्यासाठी सर्व काळातील सर्वात मोठा अन्याय स्वइच्छेने सहन केला!!

## पाठांतर वचन

यशया 53:9 " त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते."

## नाटक (भाग 2)

जेव्हा ते परत येतात तेव्हा ते खटल्यातील येशूबद्दल बोलतात कि कसे तो त्याच्या बचावासाठी एक शब्द सुध्दा बोलला नाही, त्या ऐवजी त्याने त्यांना मरणदंड देवू दिला. प्रतिनीधी म्हणतो कि ते योग्य नाही. पुढारी त्याला प्रोत्साहित करतो कि देव सर्व गोष्टीवर प्रभू आहे आणि शेवटी तो सर्व गोष्टीवर न्याया आणेल. ते 1 पेत्र 2:33 वचातात आणि पाहतात कि येशूने स्वतःला कसे पिता जो न्यायी आहे त्याच्या स्वाधीन केले. प्रतिनिधीला आता बरे वाटते जे जाणून कि देव सर्व काही पाहताते आणि त्याला माहीत आहे कि त्याने फूटबॉल घेतला नाही आणि तो शेवटी न्याय घडवून आणेल.

## न्याय


तुमच्यावर कधी खोटा आरोप लावला गेला काय? ते खूप दुखदायी असते. आपण कोणावर कोणताही आरोप करण्याआधी थोडी काळजी घेवू.

## जीवनचरित्र (न्यायधीश)

न्यायालयातील सर्वात वरचा अधीकारी न्याधीश आहे. ते दोन लोकांमधील भांडण सोडवितात किंवा खटल्याच्या दरम्यान जे पूरावे सादर केले जातात त्याच्या आधारावर ते गुन्हयासाठी दोषी व्यक्तिचे भविष्य ठरवितात.

जवाबदारीः न्याय पूरविणे, न्यायधीशाला कायदयाचे सखोल ज्ञान असते कारण ते कायदयाचे पालन होते कि नाही यावर देखरेख करतात. न्यायधीश मानव आहे आणि म्हणून तो निकाल जाहीर करतांना चूक करण्यापासून सूटलेला नाही.

संधीः एका ख्रिस्ती न्याधीशाला योग्य न्याय करण्याची आणि अनेक लोकांवर देखरेख करण्याची संधी आहे. ते केवळ कोर्टाची प्रणाली यावर प्रभाव करू शकत नाही तर, पोलीसांचे कार्य, शाळा, सार्वजनिक संस्था यावर सुध्दा करू शकतात. ह्या सर्व गोष्टी देवासाठी महत्वाच्या आहेत, जेणेकरून तो त्याची चांगले कार्य करण्यात अधिक परिणाम कारक होईल जेव्हा न्याया धीश त्याच्याकडे लक्ष देईल.



## प्रश्न आणि उत्तरे

1. धार्मिक असणे म्हणजे काय?

ते अशा लोकांबद्दल बोलते ज्यांना पवित्र शास्त्रातील निर्देश हूबेहूब पाळण्याची इच्छा आहे? ह्या गोष्टी संबंधी; त्यांना त्यांचे ज्ञान इतरांना दोष देण्यासाठी वापरायचे होत, परंतू ते त्याच प्रकारे आज्ञाचे लागूकरण स्वतःला करत नाहीत. सहसा, आपणही तसेच करू शकतो, आपण जे करू शकत नाही ते इतरांनी करावे अशी मागणी करून.

2. मग जे दोषी आहेत त्यांना शिक्षा केली पाहिजे काय?

आपण सहसा ते असे पाहतो कि, प्रत्येक व्यक्ति ज्याने पाप केले आहे त्याला शिक्षा झाली पाहिजे. पंरतू येशू आपली विचारसरणी बदलू शकतो. जेव्हा त्यांनी व्यभिचारी स्त्रीला येशूकडे आणले तेव्हा तिला पाप करतांना पकडले गेले तरी त्याने तिला दोषी ठरविले नाही (योहान 8:1-11) ज्यांनी तिच्यावर दोष लावला त्यांना येशूने सांगितले ''ज्याने कधीही पाप केले नाही त्याने पहिला धोंडा मारावा'' हे दाखविते कि आपण ज्यांनी पाप केले आहे त्यासंबंधी इतके कायदेशीर असू नये कारण आपणही त्याच परिस्थितीत असू शकतो.

3. जेव्हा मला एखाद्या गोष्टी संबंधी दोषी वाटते तेव्हा मी काय करावे?


जेव्हा आपल्याला वाटते कि आपण काहीतरी योग्य रित्या केले नाही, तेव्हा आपल्याला दोषी वाटते; आपण म्हणू शकतो कि ती चांगली भावना आहे कारण आपण हे लक्षात घेतो कि आपण चूक होतो. योग्य गोष्ट ही आहे कि त्या परिस्थितीतून शिकावे आणि वेगळे वागता यावे. पुढच्या वेळेस जर असेच काही पुढे आले तर, क्षमा मागा किंवा हानी भरून काढा. 1 योहान वाचा.

## कोड्यांची उत्तरे

नोंदी


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स | चा | शि | क्षा | दे | णे | पि |
| त्यू | अ | क | ब | र | तं | ला |
| स्व | र्मी | धि | क | पु | त्र | त |
| धा | तं | व | का | ढा | मृ | त्यू |
| स | चा | त्र | ले | री | र | क |
| ब | मू | वि | ता | र | ण | प |
| अ | स | दा | क | मा | पा | स |
| फ | अ | न्या | य | ग | अ | धि |
| स्व | शि | क्षा | दे | णी | ब | चा |





## खेळ

***हलो हलो***



भाग घेणारे उभे राहतात आणि गोल करतात. एक व्यक्ति गोलाच्या सभोवती चालतो बाहेर आणि कोणाच्या तरी खांदयाला हात लावतो. ती व्यक्ति उलटया दिशेने गोलाच्या बाहेर चालते, जो पर्यंत दोन व्यक्ति आमोरासमोर येत नाहीत. ते एकमेकांना नाव घेवून तिनदा अभिवादन करतात. मग दोन्ही व्यक्ति विरूध्द दिशेने गोलासभोवती धावतात तो पर्यंत जोवर ते रिकामी जागा भरत नाही. जो व्यक्ति हारेल तो गोलासभोवती पुन्हा धावेल आणि सर्व लोकांची पाळी येईपर्यंत खेळ चालू राहिल.




## गृहपाठ

जर ह्या आठवडयात कोणी तुम्हाला अन्यायी रित्या एखाद्या गोष्टीबद्दल दोष लावला तर स्वतःचा बचाव करू नका. देवाला मागा कि त्या व्यक्तिला दिसावे कि त्याने चूक केली आहे आणि ती त्याने स्वीकारावी. जर तो तसे करत नाही तर देवाला चांगल्या वेळेस तसे करू दया.

# मृत्यूमध्ये जीवन

09

**येशू खिळला गेलाः मत्तय 27:27-31, 45-54**



## नाटक( भाग 1)

प्रतिनीधी प्रश्नासह प्रवेश करतो. तो रागाशी झंजत आहे, त्याच्या बहिनीवर सारखा ओरतो, जेव्हा ती त्याला त्रास देते. तो चिंतीत आहे कि त्याने तारणासाठी प्रार्थना केली कि नाही कि त्याने योग्य प्रार्थना केली कि नाही. देवाने खरंच त्याचे एकले काय? जर तो त्याच्या बहीणीवर ओरडला आणि त्याने क्षमा मागण्याआधी जर काही घडले तर काय? पुढारी त्याला सांत्वन देतो, हे म्हणत कि त्याला आठवते कि जेव्हा प्रतिनिधीने येशूचा स्वीकार केला तेव्हा येशूने सर्व गोष्टीसाठी संपूर्ण खंडणी भरली, भूतकाळातील आणि भविष्यातील पापासाठी सुध्दा. प्रतिनिधीला पूर्ण खात्री नाही जेव्हा ते येशूला वधस्तंभावर मरतांना पाहण्यासाठी भूतकाळात जातात.

## धडा

शिपयांनी येशूची थट्टा केली, त्याला मारले, आणि त्याला लाकडी वधस्तंभावर खिळले. वधस्तंभावरील मरण हळूवार व दुखदायी होते, मरण्याचा भयंकार मार्ग. हे जितके वाईट होवू शकत होते तितके वाईट होते. परंतू ही घटना इतकि सामर्थ्यशाली होती कि जग हादरले! अधर्मी लोकांनी सुध्दा ओळखले कि ही महत्वाची आध्यात्मिक घटना होती आणि घोषणा केली कि येशू खरोखर देवाचा पुत्र होता. मंदिरातील परंपवित्र स्थानाला वेगळे करणारा पडदा हा फाटला, ह्याचे प्रतीक असा कि आता आपण देव जो पिता त्याच्या कडे सरळ जावू शकतो! आपले दोष आपल्याला ह्या पूढे देवापासून वेगळे ठेवीत नाहीत कारण तो आपल्याला त्याचे नितिमत्व मोफत देणगी म्हणून देतो. आपण आता बाहेर सोडलेलो असे नाही परंतू आपण सन्मानित पुत्र व कन्या म्हणून सदासर्वकाळसाठी देवाच्या कुटुंबाचा भाग होवू शकतो. आपल्याला ह्या पुढे मरणाची किंवा शत्रूची किंवा कशाचीही भिती बाळगण्याची गरज नाही कारण त्याने एकादाचा मरणावर विजय मिळविला आहे आणि त्याच्या सर्वोच्च अधिकार व सामर्थ्य ह्यासाठी तो आपल्याला प्रवेश देतो.

इब्रीलोकांचे पुस्तक हे स्पष्ट करते कि ह्या आधी आलेले महान धार्मीक व्यक्ति ज्यांना धार्मिक म्हणून ओळखल्या जात होते ते देखील स्वतःसाठी पात्र असे नव्हते परंतू येशूने वधस्तंभावर जे केले त्या द्वारे तारले गेले होते. हे आतापर्यंतचे सर्वात निस्वार्थी असे कृत्य होते आणि येशूने ते आपल्यासाठी केले! येशू मरण पावला हे स्वीकारणे आणि येशूला प्रभू व तारणारा म्हणून स्वीकारणे ह्या शिवाय दुसरे काही आपण कसे करू शकतो!

## पाठांतर वचन

यशया 53:5 " खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले."

## नाटक (भाग 2)

भूतकाळातून परत येत असता जे त्यांनी पाहिले त्यावरून संघ अजूनही आश्चर्यात होता. येशू ज्या त्रासातून गेला, आणि शिपायांनी त्याला कसे मारले ह्या संबंधी ते बोलत होते. मग ते तो वधस्तंभावर असलेला आणि सर्वत्र अंधार पसरलेला ह्या बद्दल बोलले. मग

प्रतिनिधी त्यांना सांगतो कि कसे येशूने, ''पूर्ण झाले आहे'' (योहान 19:30) हे म्हटले आणि कसे प्रतिनीधीला लगेलच कळले कि येशू ते बोलतांना प्रतिनीधीच्या सर्व पापांबद्दल बोलत होता! ''पूर्ण झाले आहे'' असे म्हणत प्रतिनिधी सर्वत्र उडया मारत होता. त्याचवेळेस पुढारी आणि तपासक हे भूमिकंप आणि तटणारे दगडं आणि मेलेले व्यक्ति जीवंत झाल्यावर होणारा गोंधळ ह्या बद्दल बोलत होते.

### न्याय

एखादी व्यक्तिसाठी सर्वात दयाळू आणि महत्वाची गोष्ट जर आपण करू शकत असू तर ती ही कि त्याला येशूची गोष्ट सांगणे आणि हे कि कशा रितीने त्याने त्याचे स्वतःचे जीवन दिले ह्यासाठी कि आपण जीवंत रहावे!


### जीवनचरित्र (पहारेकरी)

पहारेकरी हे नाव त्या व्यक्तिला दिले जाते जो संरक्षणात्मक सेवा देतो. हे सांगितले पाहिजे कि हे काम अलवचिक तसांचे असते आणि बरेचदा थकविणारे असते. काही कौशल्याआणि व्यवसायात सामान्य तासांच्या बाहेर जे काम करतात त्यांना पहारेकरी म्हटले जाते.

जवाबदारीः सहसा, कंपन्यांत आफिसच्या तसांसाठी एक पहारेकरी असतो आणि बंद असतांना एक असतो. पहारेकऱ्याने बरेच तास एकटे घालविले पाहिजे, प्रत्येक आवाजाकडे आणि प्रत्येक विचित्र हालचालीकडे लक्ष देत.

जवाबदा-याः ख्रिस्ती पहारेकऱ्याकडे कंपनीचे लोक आणि संसाधने हयांची काळजी घेण्याची संधी असते. पहारेकरी लोकांना दयाळूपणे वागवू शकतो परंतू त्याने हे लक्षात ठेवावे कि पहारेकऱ्यावर काही विशेष गोष्टी करण्यासाठी दबाव आणला जावू शकतो ते त्याने करू नये. दयाळू असा परंतू तुमच्या कामाच्या उद्दीष्टांचे पालन करीत सर्वांवर विश्वास ठेवू नका.

### प्रश्न आणि उत्तरे



1. आपण सर्व देवाची मुले आहोत काय?

नाही, योग्य गोष्ट ही आहे कि आपण सर्व त्याची निर्मीती आहोत. ही संज्ञा गोंधळवीणारी आहे. देवाची मुले होण्यासाठी आपण येशू ख्रिस्ताचा आपला तारणारा व प्रभू म्हणून स्वीकार केला पाहिजे. ''योहान 1:12'' वाचा. आपले मन व जीवन देवाला दिल्याने आपल्याला देवाची मुले होण्याचा अधिकार प्राप्त होतो, दुसरा कोणताही मार्ग नाही.


2. येशूने माझ्यासाठी त्याचा जीव का दिला?


कारण तो तुमच्यावर प्रिती करतो. हे प्रेमाचे कृत्य आहे ज्याच्यासाठी आपण पात्र नाही, योहान 3:16 वाचा आणि लक्षात घ्या, ''देवाने जगावर एवढी प्रिती केली कि त्याने त्याचा एकुलता एक पुत्र दिला''. देवाने स्वतः निर्माण केलेल्या लोकांवर इतकि प्रिती केली कि तो ज्या गोष्टीवर सर्वात ज्यास्त प्रिती करीत होता ती देण्याचे त्याने ठरविले. येशू एकुलता एक पुत्र (देवाचा एकुलता एक पुत्र) होण्यापासून; प्रथम जन्मलेला असा झाला ( तो ज्याला सर्वात ज्यास्त वारसा मिळतो) हा त्याग आहे जो आपण लक्षात ठेवला पाहिजे आणि प्रिती केली पाहिजे, आणि म्हणूनच हे तुमचे मित्र व कुटुंब हयांना सांगितले पाहिजे.

## कोड्यांची उत्तरे

नोंदी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सै | नि | क | खो | ड | शां | ट | दुः |
| बं | ओ | घ | ट | ना | ती | ला | बं |
| ड | ळ | जी | र्ध्य | क्षा | वि | नि | ड |
| री | ख | धि | व | ळ | ओ | अ | खो |
| दुः | ले | ड | मि | न | न्या | धि | री |
| नि | न्या | य | धि | ड | भ | का | सै |
| स्तं | ज | ळ | सा | स्तं | ट | र | दुः |
| वि | अ | ग | ध | म | ज | शि | क्षा |
| खो | य | व | सै | ह | र्ध्य | ळ | य |






## खेळ

***तिन मध्ये***

शिक्षक विद्यार्थ्यांना तीन तीन च्या गटात अनेक संघात विभागतात, जे सुरवात रेषेजवळ रेषा निर्माण करतात. जेव्हा शिक्षक इशारा करतात तेव्हा जो रेषेच्या सुरवातीला असतो तो धावत गोलापर्यत पोहचतो आणि परत येतो आणि दुसरा तिसऱ्याचा हात धरतो. आणि ते तिघे हात न सोडता गोल कडे पुन्हा धावतात आणि परत सुरवात रेषेकडे येतात. जो संघ आधी संपवेल तो जिंकेल.






## गृहपाठ

तो जेव्हा वधस्तंभी खिळला गेला तेव्हा त्याला जे सहन करावे लागले आणि त्याने तुम्हाला तारणाची देणगी दिली हे तुम्हाला कळले तेव्हा तुम्हाला कसे वाटले ह्या बद्दल तुमच्या आईवडीलांशी किंवा कोणा तरीशी बोला.

# लज्जा तारली गेली

10



**वधस्तंभावरील चोर: लूक 23:32-33,39-43**

### नाटक( भाग 1)

तपासकाचा दूर राहणारा एक नातेवाईक हल्ली मरण पावला. ती तिच्या नातेवाईकाबद्दल काळजीत आहे कारण त्याने त्याच्या संपूर्ण आयुष्यात देवाचे अनुसरण केले नाही, परंतू तिच्या वडीलांनी तिची भेट घेण्यासाठी प्रवास केला आणि शेवटच्या क्षणांमध्ये त्याच्या बरोबर प्रार्थना केली.  तिला माहित नाही कि त्याबद्दल काय विचार करावा. चर्चा करत असतांना कि पुढे काय करावे संघ निर्णय घेतो कि काळा मागे जावे ह्यासाठी कि येशूचे वधस्तंभावर खिळणे पहावे कारण कमी वेळात पाहण्यासारखे बरेच काही होते. पुढाऱ्याने पहिल्या वेळेस महत्वाचे संभाषण ऐकले होते जे त्यांनी गमाविले होते. जरी येशूचा त्रास पुन्हा पाहणे ही कल्पना दु:खदायी होती तरी त्यांनी निर्णय घेतला कि ते जातील आणि वेगळया जागेवर लपतील जेणे करून ते अधिक चांगल्या रितीने ऐकू शकतील.

### धडा

लूक 23:32,33,39-43 वाचा

जेव्हा येशूला वधस्तंभावर मारण्यात आले तेव्हा दोन चोरांनासुध्दा मारण्यात आले. त्यांच्या पैकि एका बरोबर येशूचे साधे आणि संक्षिप्त संभाषण झाले. ह्या मनुष्याने येशूला त्याची आठवण ठेवावी असे सांगितले. येशूने त्या मनुष्याला सांगितले कि तो येशूबरोबर सुखलोकात राहील. पुन्हा आपण पाहतो कि येशू अतिशय त्रासात असतांना सुध्दा त्याने कोणातरी सोबत बोलण्यासाठी वेळ काढला व प्रयत्न केला.

आपल्याला माहित नाही कि त्या चोराने कोणता गुन्हा केला होता कि त्याला वधस्तंभावर मारले जावे. त्याच प्रमाणे आपण ज्या चुकिच्या गोष्टी केल्या आहेत त्या महत्वाच्या नाही कारण येशू जो परिपूर्ण यज्ञ जो स्व इच्छेने  दिला गेला तो इतर कुठल्याही गोष्टी पेक्षा सामर्थ्यशाली आहे. येशूने आपल्यासाठी त्याचे जीवन मोफत दिले जेणे करून आपल्याला त्याच्याबरोबर सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे!

ही सर्वात साधे आणि सरळ वर्णन आहे कि येशू ख्रिस्ताच्या द्वारे आपण कसे तारले जावू शकतो.

### पाठांतर वचन

रोमकरांस पत्र 10:11 "कारण शास्त्र म्हणते, ‘त्याच्यावर विश्वास ठेवणारा कोणीही फजीत होणार नाही.”

## नाटक (भाग 2)

परत आल्यावर, तपासक निश्वस्त आणि आनंदीत आहे कि चोरासारखी व्यक्ति जी येशू बरोबर मरण पावली ती तारली जावू शकते आणि येशू लगेच त्याला सुखलोकात येण्याचे आमंत्रण देतो. संघ चर्चा करतो कि, प्रतिनिधीच्या भूतकाळातील आणि भविष्यातील पाप जसे येशूच्या वधस्तंभावरील मरणाद्वारे झाकले गेले तसेच तपासकाच्या नातेवाईकाच्या संपूर्ण जीवनातील पाप येशूच्या द्वारे झाकले गेले. निश्चीतच, ह्या जीवनात येशू सोबत जगणे हे चांगले आहे आणि शेवटच्या क्षणा पर्यंत त्याची प्रिती आणि आनंद आणि शांती आता अनुभवणे चांगले आहे. परंतू ते समारोप करतात कि देव उधार आहे आणि येशूचे रक्त सामर्थ्यशाली आहे.

## न्याय


ज्या रितीने आपण कुठुनही आलो किंवा काहीही केलेले असले तरी येशूची देणगी स्वीकारू शकतो त्याच रितीने इतर लोक सुध्दा कुठलेही असले किंवा त्यांनी काहीही केले तरी देवाची मोफत देणगी स्वीकारू शकतात.

## जीवनचरित्र (गायक)

गायक हा तो असतो जो व्यवसायिक रित्या कार्यक्रम करतो ज्याने गायक व्यवसाय करण्यासाठी अभ्यास केलेला असतो. गायक गीत गाण्यासाठी समर्पित असतो, आणि आशा करतो कि त्यासाठी त्याला पगार मिळेल.

जवाबदाऱ्या: गायकाने गळयाच्या प्रशिक्षणासाठी खूप काळजीपूर्वक आणि सारावासह अनुशासन ठेवले पाहिजे, कारण त्या रित्याच तो कमाई करत असतो. जर गायक प्रसिध्द झाला, तर हे महत्वाचे आहे कि नेहमीच देवाला गौरव दयावे आणि लक्षात ठेवावे कि आपण संगीताद्वारे एकमेकांना प्रोत्सिाहित करू शकतो. 1 करिंथ 14:26

संधीः ख्रिस्ती गायकांवर केवळ संगीताचे ज्ञान असण्याची जवाबदारी नाही तर देवाबरोबर सखोल संबंध ठेवण्याचीही जवाबदारी आहे. ते देवाकडून उपयोग केले जाणारे साधन होवू शकतात, विशेषतः जेव्हा मंडळीची देवाच्या भक्तिमध्ये साथ देतात तेव्हा.



सध्या सामाजिक मिडिया मूळे स्वतःला गायक म्हणून प्रसिध्द करणे सोपे आहे, आणि काहींनी त्या मार्गाने प्रसिध्दी प्राप्त केली आहे. गायक देवाच्या उपस्थितीचा अनुभव घेवू शकतो आणि इतरांना त्याच्या उपस्थितीचा अनुभव करून देण्यासाठी देव त्याचा उपयोग करून घेवू शकतो.

## प्रश्न आणि उत्तरे

1. मी केवळ ख्रिस्ताचा तारणारा म्हणून स्वीकार केल्याने तारला जावू शकतो काय?


हे इतकेच सोपे आहे. जर ते पूर्ण प्रामाणिकपणे केले तर तुम्ही तुमच्या कृतीद्वारे दाखवून दयाल कि तो तुमच्या जीवनाचा प्रभू आहे. ह्या कृती ज्या हे दाखवून देतात त्या प्रत्येकासाठी वेगळया असतात, आणि कधी कधी बदल हळू होतो आणि इतर वेळी तो लगेच होतो. आणि कधी कधी व्यक्ति येशूला त्याचा तारणारा व्हायची विनंती करतो ह्यासाठी कि काही बक्षीस किंवा काही फायदा व्हावा, म्हणून ते प्रामाणिक नसते.


2. वधस्तंभावरील चोराला त्याच्या सर्व चूकांसह तारले जाणे हे योग्य होते काय?

येशूने ओळखले कि चोराने स्वतःला नम्र केले आणि येशूसाठी उभा राहिला. ह्यामूळे दिसून आले कि चोराने पश्चाताप केला होता, आणि इतरांपेक्षा अधिक येशू सांगू शकत होता कि तो प्रामाणिक आहे. लक्षात ठेवा कि, आपण हे ठरवत नाही कि तारण कसे व्हावे, परंतू त्या ऐवजी आपण पवित्र शास्त्र वाचतो हे शिकण्यासाठी कि आपण त्या बाबतीत काय करू शकतो.

## कोड्यांची उत्तरे






## खेळ

***शेवटचे ते पहिले होतील***


सर्व स्पर्धक सुरवात रेषेकडे उभे राहतील आणि जेव्हा शिक्षक संकेत देतील तेव्हा ''धावत'' बाहेर येतील जणू काही ते हळूवार रित्या चित्रित केले जात आहे. जो शेवटी गोल कडे पोहचेल तो जिंकेल.




## गृहपाठ

ज्या गोष्टींसाठी देव तुमची मदत करू शकतो त्याची यादी तयार करा. कोणातरी सोबत त्या बद्दल बोला. आणि शेवटी रोम 10:11 हे वचन लिहा, ''वचन असे म्हणतेः त्याच्यावर विश्वास ठेवणारा कोणीहि फजित होणार नाही.''





# सर्वात वाईट दिवस सर्वात चांगला होतो

11



**येशूचे पुनरूत्थानः मत्तय 27:57-62, 28:1-10, लूक 24:36-48**

## नाटक( भाग 1)

प्रतिनिधी आज गोंधळलेला असा अला. तो समूहाला विचारतो कि येशू आपल्यासाठी का मरण पावला? मग आपल्याला जगायला मिळते आणि तो मेला आहे? पुढारी त्याला सांगतो कि येशू मरण पावलेला नाही. प्रतिनिधी प्रतिक्रिया देतो कि तो खरोखर मेला आहे कारण ते दुस-यांदा परत जाऊन काय झाले ते पाहून आले! त्याने पाहिले असूनही येशू मेला नाही हे कसे? पुढारी उत्साहित आहे जेव्हा ते काळात परत मागे जाण्याची तयारी करतात, परंतू ते उत्तर हे प्रतिनीधीसाठी आश्चर्य म्हणून अनउत्तरित ठेवतो.

## धडा

मत्तय 27:57-61 वाचा

येशूच्या शिष्यांच्या बाबतीत तर हा शेवट होता. त्यांनी विश्वास ठेवला होता कि येशू मसिहा होता ज्याचे भविष्य संदेष्टयांनी केले कि तो येईल आणि इस्राएलचे तारण करील. त्यांनी त्यांचे काम आणि त्यांचे कुटुंब येशूचे अनुसरण करण्यासाठी सोडले होते. आता, येशू मरण पावला होता आणि त्याच्या बरोबर त्यांचे स्वप्न सुध्दा.

परंतू येशू फार काळसाठी मेलेला राहिला नाही.....

मत्तय 28: 1-10 आणि लूक 24:36-48

किती अद्भूत! येशू जे खरे ते बोलला! येशू जीवंत आहे! आणि पुढील काही दिवसात येशूने शैकडो लोकांना दाखवून दिले कि तो जीवंत आहे. ते किती आनंदी झाले असतील!

कधी कधी आपण येशूला पाहण्याची गरज आहे. जेव्हा गोष्टी कठिण असतात तेव्हा त्याने स्वतःचे प्रगटीकरण करावे म्हणून त्याला मागू या, मग त्याला शोधू या आणि आपल्या जीवनात आणि आपण आजूबाजूच्या लोकांच्या जीवनात त्याचे सामर्थ्य कार्य करतांना पाहूया येशूने त्याचे स्वतःचे मरण आणि पुनरूत्थान ह्याचे भविष्य केले होते!! त्याने त्याचे महान सामर्थ्य दाखविले, सर्व संशय दूर करून आणि आपण त्याच्यावर भरवसा ठेवू शकतो आणि आपल्या जीवनाच्या सर्व भागात त्याचे अनुसरण करू शकतो.

## पाठांतर वचन

इब्री 11:1 " विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे."

## नाटक (भाग 2)

जेव्हा ते परत येतात, तेव्हा ते सर्व आनंदी आहेत, विशेषतः प्रतिनिधी ज्याला आधी माहित नव्हते कि येशू मरणातून उठला आहे! ते चर्चा करतात कि कशा प्रकारे येशू पूरला गेला, मग सकाळी स्त्रीया गेल्या आणि देवदूत....परंतू त्यांचा आवडता भाग हा होता कि एक मनुष्य स्त्रीयांकडे आला आणि अचानक त्यांच्या लक्षात आले कि तो मनुष्य येशू होता! ते चर्चा करतात कि कशा रितीने शिष्यांच्या आधी खोली बंद असतांना ते आत जाऊ शकले, आता पर्यंत त्यांनी केलेल्या सर्व कामगिरीतील हे सर्वात अवघड काम होते, आणि मग येशू अचानक खोलीत आला!

प्रतिनिधी उत्सुकतेने लक्षात आणतो कि त्याचा अर्थ काय आणि कशा रितीने एक दिवस त्याला सुध्दा येशू सारखे शरीर प्राप्त होईल जे शरीर अचानक वेगवेगळया ठिकाणी दिसले आणि मासे खाल्ले, जरी त्याला स्वतःला कोंबडी आवडते. तो पुढाऱ्याला विचारतो, जो उत्तर देतो कि त्याला नाही माहित कि हे शरीर नक्की कसे असेल परंतू ते नक्की चांगले असतील!

## न्याय


प्रत्येक जण कधी कधी निराश होतो. जे मित्र निराश आहेत त्यांच्या बरोबर दुःख करू या परंतू त्यांना आपल्या चांगल्या देवाबद्दल आठवण करून देऊ जो सर्वात वाईट परिस्थितीतून जे चांगले ते करतो.

## जीवनचरित्र (मिशनरी)

मिशनरी हा देवाने बोलाविलेला असतो आणि कधी कधी तो देश आणि त्यांची संस्कृती सोडेल आणि दुसऱ्या जागी जाईल.

काही लोक विश्वास ठेवतात कि मिशनरी लोकांना त्यांचा धर्म सोडण्यासाठी जबरदस्ती करतो, म्हणूनच बऱ्याच देशांमध्ये जिथे ते इतर देवांची भक्ति करतात तिथे त्यांना प्रवेश नाकारला जातो किंवा केवळ जे त्या ठिकाणी आहे त्यांना वाईट वागणूक दिली जाते किंवा मारल्यासुध्दा जाते.

जवाबदारीः नविन ठिकाणी जाण्याआधी त्यांना प्रशिक्षणाची गरज असते, ह्या साठी कि समजावे कि नविन संस्कृतीशी जिथे ते सेवा करणार आहे त्याशी कसे जुळवून घ्यावे, ''दुर्लभ'' जेवण खाणे शिकणे, नविन प्रकारचे कपडे घालणे आणि त्या जागेची भाष शिकणे, परंतू सर्वात महत्वाचे म्हणजे तुम्ही कोणत्याही संस्कृतीमध्ये सुर्वाता सांगत असले तर काळजी घेणे जेणे करून दरवाजे उघडे राहितील. त्याच प्रकारे तुम्ही तुमच्या देशापासून आणि तुमच्या जन्मस्थानापासून दूर असतांना तुमच्या भावनांसाठी काळजी प्राप्त करणे.



संधीः आपला देवावरील विश्वास, कठिण परिस्थितीमध्ये त्याचा पूरवठा आणि दार उघडण्यासाठी आणि जीवन बदलण्यासाठी देवाचे सामर्थ्य आणि सचोटिचा व्यक्ति असणे ह्याचे मिशनरी उदाहरण असतात.

मिशनरी असा व्यक्ति असतो जो त्याच्या कामासाठी पूर्णपणे समर्पित असतो आणि सहसा ते पूर्ण समर्पणाने, भक्तिने, करतो आणि येशूच्या पावलांवर पाऊल ठेवणे आणि महान आज्ञा पूर्ण करणे त्याला आवडते.

## प्रश्न आणि उत्तरे

1. पवित्र शास्त्र जे सांगते ते अजूनही खरे आहे काय?


देवाचे वचन कधीच कालबाहय होत नाही, येशूचा जन्म होण्याआधी बऱ्याच वर्षापूर्वी ज्या गोष्टींचा उल्लेख केला गेला त्या पूर्ण झाल्या. आता आपण पाहू शकतो कि त्याचे जे अभिवचन लिहिले गेले ते आपल्या जीवनामध्ये पूर्ण होत आहेत. जर तुम्हाला थोडेसुध्दा विश्वास असेल तर तुम्ही ते अभिवचन पूर्ण होतांना पहाल. मत्तय 24:35 वाचा आणि केवळ विश्वास ठेवा.


2. कठिण समयामध्ये देवाबरोबर विश्वासू राहणे माझ्यासाठी कठिण का आहे?

संशय वाटणे आणि आपण पुढे जाणार नाही असे वाटणे सामान्य आहे. कठिण क्षणांमध्ये, उदा. जेव्हा तुमच्या वडिलांचे काम सुटते आणि जेव्हा तुम्ही शाळेत परत जाणार असता, किंवा तुमची आई कोविड सारख्या विद्रूप वायरसने आजारी पडते, तेव्हा तुमच्या आठवणी मध्ये आणि  तुमच्या मनामध्ये साठविलेले देवाचे वचन तुम्हाला विश्वास ठेवण्यासाठी मदत करेल. कल्पना करा कि जेव्हा येशू वधस्तंभावर मरण पावला तेव्हा शिष्यांना काय वाटले असावे. त्यांनी कशावर विश्वास ठेवला होता, त्यांचा आत्मविश्वास त्यांच्या आशा सुध्दा नाहिशा होत होत्या, येशूचे शब्द होते ज्यांनी त्यांना विश्वास ठेवण्यास मदत केली.

### कोड्यांची उत्तरे










### खेळ

***निळे आणि लाल***

शिक्षक दोन समान संघ करतात, त्यातील एक ''लाल'' आणि दुसरी ''निळा'' असेल. दोन्ही संघ एकमेकांकडे तोंड करून उभे राहतात. शिक्षक आदेश देणारा राहील. उदाहणार्थ, जेव्हा ते ''लाल'' म्हणतील तेव्हा ह्या संघाने त्यांच्या मागे आधी ठरविलेल्या आश्रयस्थानाकडे धावावे. जर लालने निळयाला पकडले तर निळा लाल होईल आणि विरूध्द संघाचा भाग होईल. जो संघ दुसऱ्या संघातील अधिक खेळाडू सामील करण्यात यशस्वी होईल तो जिंकेल.






## गृहपाठ

रात्रीच्या जेवणाच्या वेळेस, तुमच्या कुटुंबाला सांगा कि मंडळीच्या कोणत्याही कार्यमध्ये तुमचा सर्वोत्कृष्ट अनुभव कोणता होता. का ते त्यांना सांगा.

# असंभव विश्वासणारा

12

**शौल विश्वास ठेवतो: प्रेषित 9:1-20**



नाटक( भाग 1)

प्रतिनिधी आज विचार करत येतो कि देवाने त्याचे तारण करण्याचे का निवडिले? तो ख्रिस्ती कुटुंबातील नाही, आणि देवाबद्दल त्याला खूप थोडके माहित आहे. उत्सूक असतांनाच तो गोधळलेला सुध्दा आहे कि देव त्याला तारू शकतो आणि सर्व लोकांमध्ये त्याला मदत करतो, जर त्याने ह्याच्या आधी इतक्या वाईट गोष्टी केल्या तरी. पुढारी सल्ला देतो कि त्यांनी जाऊन देवाने तारलेल्या सर्वात असंभव व्यक्तिला पहावे. ते (शौल) पौल ह्याला भेटण्यासाठी काळात मागे जातात.

## धडा

येशूला वधस्तंभावर खिळल्यानंतर सुध्दा धार्मीक पुढा-यांनी लोकांना येशूवर विश्वास ठेवण्यापासून थांबविण्याचा प्रयत्न केला. एक मनुष्य ज्याचे नाव शौल होत तो आवेशी धर्मिक पुढारी होता जो असा विचार करत होता कि ख्रिस्ती लोकांचा छळ करून तो देवाला जे पाहिजे ते करत आहे.

प्रेषित 9:1-22

अनन्या नावाच्या मनुष्याचा विश्वास महान असावा ज्याने देवाच्या आव्हानाला प्रतिसाद दिला ह्यासाठी कि शौल जो ख्रिस्ती लोकांना त्रास देत होता त्याला जाऊन भेटावे. परंतू आश्चर्यकारक परिणाम पहा! शौलाच्या येशू बरोबरील भेटीने त्याचे संपूर्ण आयुष्य बदलून टाकले. शौल  (ज्याला पौल देखील म्हणतात) तो लोकांना त्रास देणारा रागीष्ट मनुष्य असण्यापासून एक प्रेमळ व्यक्ति बनला जो इतरांना देवाच्या प्रिती बद्दल सांगत होता. जग भरातील लोकांना येशू बद्दल सांगण्यासाठी त्याने अनेक फेऱ्या केल्या. त्याने अनेक मंडळया स्थापन केल्या आणि इतिहासातील एक प्रभावी ख्रिस्ती बनला. देव पौला बरोबर इतका खूश होता कि त्याने जे लिहिले ते देवाने पवित्र शास्त्रात जतन करून ठेवले!

आपण अनन्या आणि पौलासारखे होवू शकतो, लोकांना येशू बद्दल आणि त्याचे अनुसरण कसे करावे हे सांगणारे. आपल्याद्वारे देव काय करतो हे आपण ह्या पृथ्वीवर कदाचीत पाहू शकणार नाही किंवा आपण ज्यांना येशूची ओळख करून देतो ते, परंतू स्वर्गात आपण आश्चर्यचकित होवू आणि आनंदाने व देवाच्या स्तुतीने भरले जावू, जेव्हा आपण ओळखू कि देवाने आपल्या जीवनाच्या द्वारे काय केले.

## पाठांतर वचन

प्रेषितांची कृत्ये1:8 "परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."

## नाटक (भाग 2)

परत आल्यावर कि शौल नावच्या मनुष्याच्या जीवनामध्ये त्यांनी पाहिलेल्या आश्चर्यकारक बदलाची ते चर्चा करतात. ते इच्छा धरतात कि शौलाने दृष्टांतात जे पाहिले ते त्यांना पाहता आले असते तर परंतू कोणीतरी अंधळा होतो आणि पुन्हा एकदा डोळस होतो हे पाहणे सुध्दा आश्चर्यकारक आहे. प्रतिनिधीच्या लक्षात येते कि जर देव जो मनुष्य ख्रिस्ती लोकांना मारत आणि तुरूंगात टाकत होता त्याला जर तारू शकतो तर देव नक्कीच त्याचे सुध्दा तारण करू शकतो. परंतू कशासाठी? पुढारी संक्षिप्त रित्या सांगतात कि कशा प्रकारे शौल (ज्याने पुढे त्याचे नाव पौल बदलले) तो कसा जगभर फिरला लोकांना येशू बद्दल सांगत आणि ज्याने पवित्र शास्त्रातील ज्याला आपण नविन करार म्हणतो त्यातील बरेच भाग लिहिला! प्रतिनिधी उत्साहित आहे कि देव त्याच्याही द्वारे काय करू शकतो.

## न्याय

कधी कधी देव आपल्याला संकेत देतो कि कोणीतरी जो इतरांना वाईट वागणूक देत आहे त्याच्याशी बोलावे. जेव्हा आपण त्याच्या बोलावण्याला प्रतिसाद देतो तेव्हा महान गोष्ट होऊ शकतात.

## जीवनचरित्र (कलाबाज)


व्यक्ति जो कार्यक्रमाचा भाग म्हणून जोखीम घेऊन व मोठया कौशल्याने, उडया मारतो, नाचतो किंवा झुलत्या दांडीवर किंवा दोरी वर इतर कलाबाजी इ. करतो

जवाबदाऱ्या: कालाबाज हा एक कलाकार आहे जो नित्यक्रम विकसित करतो जिथे तो तोल, शक्ति, एकाग्रता आणि उडयामारण्याचे कौशल्य ह्याशी संबंधीत वेगवेगळे कौशल्य दाखवितो. असे म्हणता येईल कि कलाबाजी हे कला व खेळ ह्याचे एकत्रिकरण आहे. ख्रिस्त पूर्व अनेक वर्षा आधी असे लोक होते जे सार्वजनिक रित्या कर्तब दाखवित असत, बरेचदा विधी परंपरा पूर्ण करण्यासाठी.

संधीः ख्रिस्ती कलाबाजाकडे संधी आहे कि त्याची कला लोकांना कार्यक्रमासाठी किंवा येशूची साक्ष देण्यासाठी आकर्षित करण्यासाठी दाखवावी.  ते कौशल्य आणि अनुशासन असलेल्या लोकांसाठी गंभीर होऊन धडधाकट होण्याची एक संधी असते जो वेळेचा सकारात्मक उपयोग आहे.

ॲक्रोबॅटीक जीमनास्टीकच्या बाबतीत, तो एक खेळ आहे ज्यात खेळाडू एकमेकांसोबत स्पर्धा करतात आणि विविध गुण प्राप्त करतात. स्पर्धकाने संगीताच्या साथीने वेगवेगळया कलाबाजी दाखविल्या पाहिजेत ज्यामूळे त्यांची नृत्ये शैली विकसित करण्यासाठी त्यांना मदत मिळते. ह्या मूळे अधिक जमाव आर्कषित होतो ज्या मूळे चांगले साक्ष दिली जाऊ शकते.

## प्रश्न आणि उत्तरे



1. मी पूर्णतः बदलू शकतो काय?

होय, परंतू जर आपण स्वतःहून ते करण्याचा प्रयत्न केला तर ते जवळजवळ अशक्य कार्य आहे. परंतू मुद्दा हा आहे कि आपले जीवन, भावना आणि विचार येशूख्रिस्तामध्ये सोडावे. अशा प्रकारे आपण पूर्णतः बदलू शकतो कारण आपली शक्ति देवावर अवलंबून असते. इतिहासामध्ये आपण पाहतो कि शौल पूर्णपणे बदलला मंडळीचा छळ करणाऱ्या पासून देवाचा प्रेषित होण्यापर्यंत ज्याला देवाने जगावर प्रभाव करण्यासाठी आणि नविन करारातील बराच भाग लिहिण्यासाठी वापरून घेतले. प्रेषितांची कृत्ये पौलाचे ''साहस'' शौल पूर्णतः बदलणे ह्या बद्दल बोलतो.

2. देवाने मला जे सांगितले आहे ते मला नेहमी समजत का नाही?

देव प्रत्येक व्यक्तिबरोबर वेगवेगळया प्रकारे बोलतो. ते तुमच्या हातातील बोटांप्रमाणे आहे; त्यांना वेगवेगळे कार्य असतात, परंतू ते सर्वच उपयोगी आहेत. कधी कधी आपल्याला कळत नाही कि कोणतरी आपण जे करणार नाही ते करावे अशी इच्छा का दाखवितो अणि आपण त्यांच्या वृत्तीचे कारण समजू शकत नाही. आपल्याला हे कळू शकत नाही कि देवाने त्या व्यक्तिला काय म्हटले. पेत्र आणि पौलसोबत असेच काही घडले. पेत्र गैरयहूदी लोकांना तारणाबद्दल सांगण्यात परिणामकारक नव्हता, परंतू देवाने ती कामगिरी पौलाला दिली.

## कोड्यांची उत्तरे



नोंदी


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| य | शौ | प्रा | री | दि | रा | ल |
| व | रू | ढा | स | णा | ति | आ |
| ध | पु | श | स | क | वि | नं |
| स्तं | हू | श्वा | ले | स | र्ता | द |
| भा | वि | स्तु | श | म | रो | न |
| व | सा | श्वा | दे | स्तं | ख | स |
| र | ख | क्षी | श | शा | स्तु | ति |
| खि | शौ | ल | त्र | दि | भा | य |
| ळ | क | वि | श्वा | स | शा | हू |
| णे | प | आ | नं | दे | र | दा |






## खेळ

***एका बाजू कडून दुसऱ्या बाजू कडे***



शिक्षक गटाला दोन ओळीत विभागतात. जेव्हा शिक्षक इशारा देतात तेव्हा सुरवातीचा खेळाडू तिवा धावतो जेणे करून त्याचा उजवा हात शेवट रेषेकडे जाईल. जेव्हा ते शेवट रेषेकडे पाहोचतात तेव्हा ते न फिरता पुन्हा वापस धावतात. जेव्हा ते बाकिच्या संघाकडे परत येतात तेव्हा ते पुढील खेळाडूला स्पर्श करतात आणि ओळीच्या शेवटी जातात. प्रत्येक खेळाडू तसेच करतो जोवर सर्व धावत नाहीत. जो संघ पहिले संपवेल तो जिंकेल.




## गृहपाठ

वर्गाला सांगा कि तुम्ही येशूवर कसा विश्वास ठेवला आणि तुम्हाला त्याच्या बद्दल कोणी सांगितले. आणि जर तुम्हाला येशूबद्दल संदेश दयाचा असेल तर तुम्ही पाळक, सुर्वातिक व्हाल का कि तुम्ही इतर काही कार्य कराल.

# मी सुद्धा येऊ शकतो काय?

13

**पेत्र तारणाचा संदेश देतो: प्रेषित 2:14, 36-40**



## नाटक( भाग 1)

तपासक आणि प्रतिनिधी येशूचे मरण आणि पुनरत्थान ह्याबद्दल पूर्णपणे खात्री झालेले आहे आणि त्यांची खात्री आहे कि देवा त्यांचा उपयोग करेल. परंतू कसा? पुढारी सल्ला देतो कि त्यांनी काळात मागे जावे हे पाहण्यासाठी कि येशू स्वर्गात गेल्यावर त्याच्या शिष्यांनी काय केले.

## धडा

प्रेषित 2:1-14,36-40 वाचा

पेत्राने अलिकडेच नकारले होते कि तो येशूला ओळखतो. आता येशू मरणातून उठल्यानंतर तो त्याला भेटला होता, येशूने परत त्याचा स्वीकार केला आणि पेत्र देवाच्या पवित्र आत्म्याने भरला गेला. त्याचा शोक आनंदात बदलला होता. देवामध्ये सापडलेल्या ह्या नविन सामर्थ्यामूळे तो खाली जाऊन लोकसमुदायाशी बोलू शकला. तो त्यांच्याशी काही कठिण गोष्टी बोलला परंतू त्याने तारणाचा मार्ग सुध्दा स्पष्ट केला.

आपण सर्वांनीच चुकिच्या गोष्टी केल्या आहे. आपण खोटे बोललो किंवा स्वार्थी होतो किंवा इतरांसोबत वाईट वागलो ज्यांना पाप असे म्हणतात. आपण पापात जन्मलो म्हणून आपण देवापासून वेगळे आहोत, आपण लज्जेत जन्मलो त्याच्या कुटुंबाच्या बाहेर, आणि आपण अंधकार व मरण ह्याच्या सामर्थ्याखाली जन्मलो. परंतू एक आनंदाची बातमी आहे! येशू वधस्तंभावर मरण पावला आणि पुन्हा जीवंत आहे! येशूवर विश्वास ठेवणे हे आपल्या जीवनातील त्या पापाचे सामर्थ्य मोडते, आपल्याला देवाच्या संबंधात पुन्हा आणते, सर्व लज्जा दूर करत आपल्याला त्याच्या कुटुंबात सदासर्वकाळसाठी आणते, आणि आपल्याला त्याच्या प्रकाशात आणि प्रेमळ अधिकाराखाली आणत.

जर तुम्हाला येशूच्या द्वारे देवाची देणगी स्वीकाराची आहे तर विशिष्ट अशी प्रार्थना नाही जे पवित्र शास्त्र सांगते कि आपण म्हटली पाहिजे, परंतू ह्यासारखे काहीही काम करेल. येशू तुमची आतुरतेने वाट पाहत आहे.

‘‘ प्रभू येशू, मी तुला वयैक्तिरित्या जाणू इच्छितो. माझ्या पापासाठी वधस्तंभावर मरण्यासाठी तुझे आभार. तुला माझा तारणारा आणि प्रभू म्हणून स्वीकारण्साठी मी माझ्या जीवनाचे दार उघडतो. माझ्या पापांची क्षमा करून मला सार्वकालिक जीवन देण्यासाठी तुझे आभार. माझ्या जीवनाच्या सिंहासनाचा ताबा घे. मी जसा व्यक्ति बनावे अशी तुझी इच्छा आहे तसे मला बनव.’’

जर तुम्ही ती प्रार्थना केली असेल तर स्वर्गात आनंद झाला असावा!

## पाठांतर वचन

योहान 3:16 "देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे."

## नाटक (भाग 2)

परत आल्यावर संघ उत्साही आहे. त्यांनी आत्ताच पेत्र, एक अशिक्षित मासे धारणारा ज्याने येशूचा नाकार केला त्याला उभा होऊन मोठया लोकसमुदायापुढे धैर्याने बोलतांना पाहिले. पुढारी प्रतिनिधी आणि तपासाकाला प्रोत्सहन देतो, त्यांना हे सांगत कि जो कोणी येशूवर विश्वास ठेवतो त्याला सुध्दा पवित्र आत्मा प्राप्त होतो, जसे शिष्यांना प्राप्त झाला आणि तो त्यांना धैर्याने बोलण्यासाठी आणि मंडळीत आणि जिथे कुठे देवाचे लोक आहेत तिथे ज्या गोष्टीत ते चांगले आहेत त्याप्रकारे सेवा करण्यासाठी मदत करेल. तपासक लहान मुलांसंबंधी मदत करण्यासाठी आणि दुसऱ्या देशातील मित्र बनविण्यासाठी अतिशय उत्तम होती. प्रतिनिधी भिंतीवरील लटकणांचा त्याच्या लहान व्यवसायाची बांधणी करत आहे आणि त्याला नेहमी कुतूहल असते व तो अंदाज लावत असतो कि गोष्टी कशा काम करतात. त्यांनी दोघांनीही येशूच्या जीवनातील अद्भूत गोष्टी पाहिल्या आहेत. पवित्र आत्म्याच्या मदतीने ते ह्या सर्व गोष्टींचा उपयोग लोकांना येशू बद्दल सांगण्यासाठी येशूला त्यांच्याही जीवत स्वीकार करण्यास सांगण्यासाठी करू शकता!

## न्याय


देव तुमच्यावर इतकि प्रिती करतो कि त्याने त्याचा स्वतःचा पुत्र तुमच्यासाठी दिला कि तुम्हाला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. आपण स्वतःला इतरांसाठी देउन ही प्रिती व्यक्त करू या.

## जीवनचरित्र (कोळी)

कोळी ती व्यक्ति आहे जी मासे व इतर जलचर प्राणी धरून पोट भरते. ते स्वतःचे पोट भरण्यासाठी व विकण्यासाठी पूरेल एवढे मासे धरण्याचा प्रयत्न करतात. मानव जातीच्या सुरवातीपासून अस्तित्वात असलेला हा व्यवसाय आहे.

जवाबदा-याः कोळी समुद्र मासे पकडण्यासाठी जातात आणि मासे व शिंप घेऊन परत येतात. मासेपकडणारा समूह वेगवेगळे कार्य व जवाबदारी असलेल्या लोकांनी बनलेला असतो. साहित्य हाताळने, नौकाचालविणे, माश्यांचे वर्गीकरण करणे आणि त्यांना बर्फात किंवा डव्यात ठेवणे, कधी कधी त्यांचे काटे वेगळे करणे ( पण आक्टोपसचे काटे वेगळे करू शकत नाही) आणि त्यांना बाजारात आणणे असे काम असते.

संधीः ख्रिस्ती कोळयाकडे संधी असते कि त्याच्या संघासोबत चांगले काम करावे, ते कुठे मासे धरतात आणि त्यांनी काय पकडले ह्यासंबंधी प्रमाणिक असावे आणि त्यांनी धरलेल्या माश्यांसाठी योग्य किंमत लावावी. ते सामाजाची महान सेवा करतात कारण अनेक लोकांसाठी मासे हे मुख्य भोजन आहे आणि ते परवडणारे व आरोग्यदायी आहे.



## प्रश्न आणि उत्तरे

1. सार्वजनिक रित्या सुर्वाता सांगणे अधिक कठिण आहे काय?


हे व्यक्तिच्या चारित्र्यावर अवलंबून राहिल. सार्वजनिक रित्या सुर्वातासांगण्यासाठी आपण पवित्र शास्त्र वाचून जे विषय लोकांच्या आवडीचे आहेत त्याची तयारी करावी. असे लोक आहेत ज्यांना श्रोत्यांपुढे देवाचे वचन सांगणे ह्या पेक्षा एका व्यक्तिबरोबर वैयक्तिक रित्या बोलणे कठिण आहे असे वाटते. वेळेनुसार आपण शिकू कि आपण सुर्वाताप्रसारात चांगले कार्य कसे करू शकतो.


2. मी जे करतो त्याचा मला पून्हा पश्चाताप झाला तर?

आपण मनुष्यप्राणी आहोत आपल्याला त्रास देणाऱ्या व देवाला दुःख देणाऱ्या गोष्टीकडून दूर जाण्याची ताकत आपल्यात नाही. परंतू आपण ज्या क्षेत्रात कमजोर आहोत त्यात देव आपल्याला सामर्थ्य देवू शकतो. आपल्याला पश्चाताप होईल अशा गोष्टी आपण अजूनही करू शकतो परंतू हळू हळू देव आपल्याला सामर्थ्यवान बनण्यासाठी मदत करेल.

### कोड्यांची उत्तरे









### खेळ

***तुमच्या पाय सोटु देऊ नका***

शिक्षक विद्यार्थ्यांना तीन किंवा चार रेषेत विभागतात. जेव्हा संकेत दिला जातो तेव्हा प्रत्येक पुढारीपण करणाऱ्या खेळाडूने त्यांचा पाय प्रत्येक हाताने पकडावा आणि तो सुटु न देता उद्दिष्टा पर्यंत पोहचण्यासाठी शक्य तितक्या वेगाने चालावे, आणि दुसऱ्या खेळाडूसाठी परत यावे. जर खेळाडू पाय सोडतो किंवा पडतो तर त्याने पुन्हा सुरवात बिंदू कडे यावे. जो संघ आधी संपवेल तो जिंकेल.






### गृहपाठ

जर तुम्हाला आठवते कि तुम्ही कोणाबरोबर हल्ली खोटे बोलले तर त्याव्यक्ति कडे जाण्याचा प्रयत्न करा आणि क्षमा मागा.